# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १७/०६/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १७/०६/२००८ रोजी सभा सुचना क्र. ०४ दि. १०/०६/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**<u>उपस्थित अधिकारी</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| २) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ३) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ४) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ६) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ७) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ८) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ९) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| १०) | श्री. हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ११) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| १२) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १३) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १४) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १५) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| १६) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १७) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १८) | श्री. सोनारे | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १९) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| २०) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| २१) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| २२) | श्री. सुनिल यादव | -- | चौकशी अधिकारी |
| २३) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| २४) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| २५) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| २६) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टीम मॅनेजर, नागरी सुविधा केंद्र |
| २७) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ३) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ४) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| ५) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |

**मा. सभापती :-**

नमस्कार, आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सदस्या, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी तर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो. त्यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. आणि आजच्या सभेला सुरूवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने,

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- १०/०६/२००८.**

**<u>मा. स्थायी समिती सभा</u>**

**सभा सूचना क्र. :- ०४, दिनांक १०/०६/२००८**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १७/०६/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४, दि. १०/०६/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

प्रकरण क्र. १६, दि. ०७/०२/२००८ व दि. १८/०२/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**सुनिता पाटील :-**

दि. ०७/०२/२००८ व दि. १८/०२/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये आपण परिवहनचे इलेक्ट्रीक फिटींगचे पैसे बाद केले होते. अवलोकनामधुन. त्याचा कुठेही उल्लेख झालेला नाही. अवलोकनामध्ये परिवहनचा खर्च परिवहनने करावा.

**नगरसचिव :-**

कट केले.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. सचिवांनी दुसरा विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. १६ :-**

दि. ०७/०२/२००८ व दि. १८/०२/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६ :-**

दि. ०७/०२/२००८ व दि. १८/०२/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. सुनिता पाटील.        अनुमोदक :- श्री. तुळशीदास म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**मा. स्थायी समिती**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, आर.सी.सी. पाईप व सक्शन मशिन दराबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर. सी. सी. पाईप खरेदी करायची आहे की, केले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आर.सी.सी. पाईप खरेदी केलेली आहे. आपण त्याला इमरजन्सी मध्ये आर.सी.सी. पाईप टाकले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर. सी. सी. पाईप खरेदी केल्यानंतर तुम्ही आमच्याकडे निविदा का पाठवता? एकतर अवलोकनाचा विषय असेल. परत मा. आयुक्त साहेबांनी ह्याच्यातले किती पाईप ठेवले किती पाईप परत काढले.

**मा. सभापती :-**

हा मा. आयुक्त साहेबांचा विषय नाही हा नाले साफसफाईचा विषय आहे. आपण डी.सी. रूल्स प्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्या डी.सी. रूल्स प्रमाणे मान्यता करायचे असेल तर करा नाहीतर वाढीव काढायचे असेल तर वाढीव सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, हा विषय असा नाही. पाईप खरेदी झालेले आहे. पाईप टाकले गेलेले आहे. त्याच्यातले अर्धे पाईप काढले गेलेले आहे. ते व्यवस्थित टाकले नाही किंवा गरज नसताना टाकले गेलेले आहे. आम्हाला त्याचा अहवाल पाहिजे आणि डी.सी. रूलची जी टीपणी दिलेली आहे. तो विषय नंतरचा आहे. पाईप खरेदी केलेले आहे. पाईप टाकले आणि काढले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदरचे पाईप हे आपण टाकले. तिथे पाणी कमी जात असल्यामुळे पाईप काढलेले आहेत. आणि पावसाळा संपल्यानंतर पुन्हा तिथे पाईप टाकणार आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब किती पाईप काढले? किती लावले? आणि किती खरेदी केले ते जरा सांगा ना. माझी सभागृहाला विनंती आहे की, अशा पद्धतीने प्रशासन निविदा मागवताना निविदा आपल्याकडे येते. पाईप खरेदी केले. पाईप टाकले, पाईप काढले. आणि निविदा फक्त मंजुरीसाठी ठेवतो. त्याचे टेंडर नोटीस काढतात. आमच्या सभागृहाचा अपमान आहे. तुम्ही ही गोष्ट इकडे नोंद करा. ह्या प्रोसिडींगमध्ये ही गोष्ट नोंद करा की, पाईप ची निविदाचे डी.एस.आर. रेटने जास्त ठेके आलेले आहे. म्हणून आम्हाला स्थायी समितीला शिफारस केली की, रेट बाजार भावाने वाजवी आहे. ह्यापुर्वी म्हणजे ह्याच्या आधीच पाईप खरेदी केले आहेत. पाईप टाकले गेलेले आहे. आणि त्याच्यातले पाईप पुन्हा काढले गेलेले आहे. त्याचा अहवाल आम्हाला पहिला द्या.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसचिव साहेब, एकतर मा. महासभेचे प्रोसिडींग आले आणि हे स्थायी समितीचे आहे. हे बघा अशा पद्धतीने फिगर्स दिले ते काय दिले काही नाही ते आम्हाला कळत नाही. आपल्याला प्रॉब्लेम काय आहे? आता आम्ही ह्या गोषवाऱ्यावर निर्णय घेणार. त्या मा. महासभेची प्रोसिडींग पण माझ्याकडे आहे. त्याच्यातले पान आणि पानच दिसत नाही. मग देता तरी कशाला तुमचे कसे आहे की ७० पानांची प्रोसिडींग दिले. तुमचा कार्यभार संपला. तुमचे रेकॉर्डवर आले बरोबर. त्या ७० पानामध्ये २५ पाने आम्हाला कळतच नाही. हे फिगर्स दिसत नाही. तर आम्ही ह्याच्यावर काय निर्णय घ्यायचा. आपण जरा इतर महानगरपालिकेची प्रोसिडींग बघा. आपल्याकडे कसे आहे की, एक मेहरबानी केल्यासारखे तुम्ही काम करता. तुमच्या हाताखालचा माणूस हा त्याच्यापेक्षा मोठी मेहरबानी केलेय असा काम करतो. त्या ठाणे महानगरपालिकेला जावून बघा त्यांची प्रोसिडींग किती व्यवस्थित असते. एकच ॲक्ट आहे. एकच पद्धती आहे. आणि हे काय ते बघा. आता ह्याच्यामध्ये दोन करोड रू. लिहिले, २ लाख रू. लिहिले की २०० रू. लिहिले की २ रु. लिहिले ते काहीच कळत नाही.

**एस. ए. खान :-**

झाले ना. दोनवर झिरो वाढवले आणि सगळ्यांचा आमाउन्टवर जास्त पगार गेला.

**मिलन म्हात्रे :-**

तो तर एक मोठा जोक आहे. ह्याच्यामध्ये ती रक्कम विड्रॉ केली गेली तिथपर्यंत आपले अधिकारी झोपले होते का? स्वतःचा चेक बुक कोण कोणी देईल का? सही फक्त केलेली आणि आता ह्याला जिम्मेदार कोण आहे. मा. सभापती साहेब, आम्हाला ह्याच्यावर कार्यवाही पाहिजे. असे देणारे कोण व्यक्ती आहे. त्याचे नाव द्या मग, मिटींग चालवा. मा. महासभेचे पण असच झाले आहे.

**मा. सभापती :-**

तुम्हाला काय पाहिजे ते बघु शकता ना.

**मिलन म्हात्रे :-**

बघू शकता असे नाही. आठवडा भर....

**मा. सभापती :-**

सर्व पेपरर्स .....

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे बघा मेहरबानी करून तुम्ही कोणाचीही बाजू घेउ नका. स्पष्ट सांगतो.

**मा. सभापती :-**

बाजू घ्यायचा प्रश्न येतो कुठे? मला कोणाचे कसले काही पडलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

एक आठवडा आधी प्रोसिडींग देता कशाला?

**मा. सभापती :-**

तुम्ही कुठल्याही दुकानामध्ये झेरॉक्स काढायला जाता. तर त्या सर्व झेरॉक्स सारख्या निघतील का?

**मिलन म्हात्रे :-**

निघतात. मी आणतो ना. मी तुम्हाला १००० झेरॉक्स काढून आणतो. कोण बोलते निघत नाही. त्या झेरॉक्स मशिनमुळे करोडो रूपयाचा लॉस झालेला आहे. सगळ्या डिपार्टमेंटमध्ये वाटेल तशी उधळपट्टी चालते.

**मा. सभापती :-**

आपण जरी झेरॉक्स काढायला गेलो तर १० कॉपीमधली एक कॉपी खराब निघतेच.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या कॉपी निघत असतील. आमच्या कॉपी निघत नाही. आणि खराब कॉपी आम्ही चालवत पण नाही. आणि त्या खराब कॉपीवर आम्ही निर्णय घ्यायचा. असे तुमचे म्हणणे आहे का? मा. महासभेचे १ नाही २५ पाने असे पाठवले.

**मा. सभापती :-**

तुम्हाला घ्यायचा तो निर्णय घ्या. बाजुला पाहिजे तर बाजूला पेपर बघून घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

बाजुला पण तसेच आहे ना. पान नं. १७ काढा ते बघा साहेब अस नसते. बरोबर नाही किंवा आम्हाला अशी मुद्दामहून कॉपी खराब देतात. मिलन म्हात्रे पुसट असेल तर मुद्दामहुन पाठवतात का? मग ह्याचे बरोबर आणि माझे पेपर्स खराब. तर मी असच समजणार. माझ्याकडे मा. महासभेचे प्रोसिडींग सुद्ध असेच आलेले आहे. म्हणून मला त्या माणसाचे नाव पाहिजे आणि त्यावर कारवाई काय करतात ते बोला. एकच चुक होईल. मा. महासभेचे सुद्धा असेच प्रोसिडींग असते. प्रोसिडींगला फायनल मंजुरी असते. तुमचे दोन लाख रू. चे टेंडर मंजुर झाले आणि प्रोसिडींगमध्ये २ करोड रू. असेल तर आम्हाला सांगायला नको. आता सन्मा. सदस्य गारोडीया साहेब बोलतात ते चुकीचे बोलत नाही. आम्ही जर तुम्हाला दोन लाखाची मंजुरी दिलेय ह्या प्रोसिडींगमध्ये तुमच्या अधिकाऱ्यांनी दोन करोड रू. दिले आणि आम्हाला कळले नाही. तर तुम्हाला हे सगळ मजाक वाटते. माझा तर स्पष्ट आरोप आहे की, तुम्ही मला ज्या दोन प्रोसिडींग दिल्या आहेत त्या मुद्दामहुन दिल्या आहेत. मला कळू नये. माझा काहीतरी भ्रम निरास व्हावा म्हणून मला अशा कॉप्या आल्या. मुद्दामहुन माझे नाव टाकून दिले हा सर्व मजाक आहे का? हे बाय मिस्टेक होवू शकते. पण मा. महासभेची प्रोसिडींग सुद्धा अशीच आहे. आम्ही आठवडा भर आधी वाचतो. तुम्ही आम्हाला आठवडाभर प्रोसिडीग का देता. ह्याचे आम्हाला अवलोकन व्हावे कळावे. काय असेल चुक कळू नये आम्हाला त्याच्यावर अभ्यास करायला मिळावा म्हणून तुम्ही प्रोसिडींग देता ना. ही कॉपी देता ना. त्याची पद्धत ही आहे. ह्याच्यात काही कळतच नाही. ते बोलतात ते बरोबर आहे. आम्ही मंजुरी दिले त्याना ते कळवायला पाहिजे ना. डी.सी.आर. रेट नुसार काय अमुक अमुक आहे. प्रॉब्लेम काय आहे? महागाई केवढी झाले व मार्केट रेट काय वाढला?

**एस. ए. खान :-**

त्याचा पुर्ण अहवाल द्या ना. कुठे बसवले? काय बसवले? ते दाखवा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

माझ्याकडे लिस्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येकवेळी मा. सभापती साहेब नाही चालणार. आमच्याकडे तयार आहे, तयार आहे म्हणजे काय?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

माझ्याकडे लिस्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही पाईप का काढले? ज्या ठिकाणी आवश्यकता नव्हती तर २७४ पाईप टाकले कशाला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पहिल्याच पावसामध्ये पाणी जास्त नव्हते. म्हणून पाईप काढलेला आणि पावसाळा संपल्यानंतर पुन्हा पाईप लावणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे पुन्हा पुढच्या पावसामध्ये पाईप काढणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

चार महिने झाले की, पुन्हा पाईप लागणारच.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग परत काढणार? तर कसा लावणार आता पाणी जात नाही मग तुम्ही कसे पाईप टाकणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण प्रयत्न करून बघितले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला पहिले सांगा की, तुम्ही निविदाच्या अगोदर पाईप का मागवले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठेकेदाराने त्या दरात काम करण्यास नकार दिल्यामुळे आपण फेरविचार करा. त्यासाठी स्थायी समितीला विषय आणला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यात तुम्ही पाईप टाकून घेतले ना?

**मिलन म्हात्रे :-**

ठेकेदाराने नकार दिला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

इमरजन्सी म्हणून आपण घेतो. नकार म्हणजे इन द सेन्स सांगितले की.....

**मिलन म्हात्रे :-**

आता आपण सांगितले की, ठेकेदाराने नकार दिला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नकार म्हणजे त्यांनी सांगितले की, मला हा रेट परवडत नाही. असे तोंडी सांगितलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नकार दिला का? एक काहीतरी बोला हो किंवा नाही. नकार दिला असेल तर आम्ही ठरावामध्ये शेवटच्या दोन लाईन काय दिले. मा. आयुक्त साहेबांना सांगून पोलिस फोर्स घेउन त्याच्यावर कार्यवाही करा. उद्या ते काही काही रेट टाकतील असे थोडीच आहे. मा. आयुक्त साहेब, आमचे म्हणणे काय निघाले डी.सी.आर. रेट नुसार पहिला बांधकाम विभागाशी कंन्सल्ट करा. मागच्या मिटींगमध्ये काय झाले होते की, ह्यांनी सिटी इंजिनियरशी कंन्सल्ट केले नव्हते. हा ह्यांचा पहिला फॉल्ट. आपण सुरूवातीला सांगतो की, गोष्ट अशी करा की ह्यात कॉम्प्लीकेशन आली नाही पाहिजेत. सिटी इंजिनियरने सरळ सांगितले की, ह्याच्यामध्ये आम्हाला कन्सल्ट केले नाही. आम्हाला विचारले नाही. तर आम्ही कशाला रेट देवू. ह्यांनी डायरेक्ट टेंडर काढून टाकले. आता आमचे म्हणणे असे आहे की, डी. सी. आर. रेट कशासाठी आहे. कुठेतरी तुम्हाला बंधन आहे. साहेब, ५८ रू. चे ३५० रू असतील तर आम्ही कशी मंजुरी देणार ते आम्हाला सांगा चला डी.सी.आर. रेट ५८ रू. आहे. प्रॅक्टीकली १०० रू. होतो. तर तुम्ही आम्हाला समजावुन सांगा ना डी.सी.आर. रेटमध्ये ५८ रू. आहे. त्याच्यात ट्रॉन्सपोडीशन आहे. भाववाढ एवढी झाले. त्यावेळेला मार्केटचा रेट ५० रू. होता म्हणून तो डी.सी.आर. रेट ५० रू. आहे. पण आता सिमेंटचे भाव वाढले आहेत, स्टीलचे भाव वाढले आहेत. काय असेल तर तुम्ही आम्हाला विधिवत द्या. ठोबळ असे सगळ दिलेले आहे. पंम्पसेट चालवण्याकरिता दोन अडीच वर्षाचा अनुभव पाहिजे. दुकानातला आणला की लावला त्याला काय अनुभव पाहिजे. डिझेल भरले, किक मारली पंम्प चालू झाला. असे काही वादग्रस्त जे आहे. समजुन घ्या. तुमच्या कानावर टाकले की नाही ते मला माहित नाही. पण तो मी ठराव केला की, इमरजन्सीमध्ये कुठल्याही ठेकेदारानी जर ठेका घेतल्यानंतर नाही सांगितले किंवा त्यांनी काही अडचण आणली तर तुम्ही लोकल पोलिस स्टेशनला केस करा आणि आतमध्ये टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, एक गोष्ट अजुन सांगायची आहे. टिपणीमध्ये त्यांनी क्लीअर लिहिले की, मशिन जिल्हा दर सुचीनुसार निविदा धारकास पुरवठा करणे शक्य होत नाही. तर ते दर कधी आले? तुम्ही निविदा कधी

काढली? माझ्याकडे एक निविदा आहे. शुक्रवार ५ तारखेला स्टँडींग झाली. ६ तारीख शनिवार, ७ तारीख रविवार. म्हणजे स्टँडींग ला ही निविदा नक्कीच पास होणार आहे. ही प्रोसिडींग नक्कीच पास होणार आहे. ही निविदा आहे बघा. म्हणजे स्थायी समिती ही शुक्रवारी होते आणि शनिवारी पेपरमध्ये जाहिरात निघते. चेअरमन साहेबांची सही आहे. ठरावावर सही आहे काय आहे का नाही? मा. आयुक्त साहेबांना कळवायचे की नाही. म्हणजे किती घाई आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये मी समितीच्या सर्व सदस्यांना सांगू इच्छितो की, हा जो नालेसफाईचा विषय आहे तो आपण दरवर्षी करतो आणि मागच्या वर्षी जे काही रेट होते. त्या सर्वच बाबतीत असतील. मजुर असतील, डंपर असतील, किंवा जे.सी.बी. असतील, पोकलन असेल, बोटीसह पोकलेन असेल किंवा पाईप असतील, सक्शन पंप असतील. म्हणजे आपल्या मोटारी असतील हे सगळ आयटम मागच्या वर्षी प्रमाणे आपण घेत होतो. आता मागच्या वर्षीचे जे रेट होते. तो बेस धरून आपण पुढे जावा अशी आपल्या विभागाची अपेक्षा होती. त्या प्रमाणे त्यांनी पुटअप केले. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ही वस्तुस्थिती आहे की, डी.एस.आर. रेट त्याच्यामध्ये ह्या दोन आयटममध्ये घेतले नव्हते. तथापी एकतर फार गडबड होती. आपण आचारसंहितेत मान्यता घेवून आपल्याकडे १५ दिवस शिल्लक होते. एवढी आपण लगीनघाई करुन आणि युध्दपातळीवर काम करुन सुध्दा पावसाने शेवटी आपल्याला गाठलच आणि काही का असेना क्विन्स पार्क सारख्या ठिकाणी तरी गुढगेभर पाणी जमा झाले. त्यामुळे डिपार्टमेंटचा उद्देश साधा सरळ होता की, लवकर करावे आणि मागच्यावर्षी आधी मंजुर झालेला आहे. त्याअर्थी ह्याच्यात कमी जास्त करून ह्यावर्षी जे काही होईल त्याप्रमाणे करावे. अशी अपेक्षा होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब त्यांनी त्याच्यातले पाईप काढले.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ह्याच्यामध्ये असे आहे की, तुम्ही सगळे माझ्या बरोबर फिरलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेंडरमध्ये तसे वाढीव पेपर आहे. साहेब, आम्ही बोलतो ना ते पाईप काढलेले आहेत. पाईप खरेदी केलेले आहे. तेच पाईप ही प्रथा इकडे महापालिकेत चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेबांनी बरोबर सांगितले की, हा नाले सफाईचा विषय आहे. ह्यापूर्वी टेंडर फायनल झालेले आहे. त्या टेंडरमधले दोन आयटम संबंधित गुत्तेदारांना परवडत नाही. कारण मार्केटरेट खरच जास्त आहे. त्यामुळे हो विषय परत पुर्नविचारासाठी आणलेला आहे. जर आपल्याला वाटले की खरच पुर्नविचारासाठी आणलेला आहे. जर आपल्याला वाटले की, खरच त्याचे नुकसान आहे तर मान्य करावा. आपल्याला जर वाटले की, कमी जास्त करावा तर तेही करा. कारण आपल्याला तशी मुभा आहे. फक्त त्याचा उद्देश साधा सरळ आहे की, नालेसफाईचे काम आपण सगळीकडे करून घेतलेले आहे. आणि नालेसफाई करताना तिथे जर एखादी मोठी बिल्डींग आहे आणि तुम्ही तेथुन भलामोठा नाला काढला. तिथे लहान लहान मुले आहेत. शाळेत जातात. तर त्यांनी तो नाला पार करून कसे जायचे. मग आपण लाकडी फाळके लावले. लोखंडी फाळके टाकले. मग कधी कधी एक एक पाईप टाकला. आधी छोटे पाईप होते मग मोठे पाईप सांगितले. मोठे पाईप टाकले तरी मागून एवढे पाणी येते. तेही पुरले नाही. म्हणून ते ही पाईप ऐन वेळेला काढले मग एकाच्या ऐवजी दोन पाईप टाकले. कसे आहे की, भाईंदर ईस्ट असेल, भाईंदर वेस्ट असेल किंवा मिरा रोड असेल जे फार जुना एरिया आहे. तिथे काही एक्सपिरिमेंट करायची नाही. ते वर्षानुवर्षे चालले आहे. म्हणजे कनकियाचे जे मागचे भाग आहे. तिथे पाणी किती येते कोठून येते हे कोणालाच माहित नाही. तिथे एक्सपिरीमेंट करायला लागेल हि वस्तुस्थिती आहे. मी स्वतः त्याला विटनेस आहे. माझ्या समोर मी स्वतः चार ठिकाणाहून पाईप काढायला सांगितले कारण, आय एम इन्ट्रेस्टींग इन ड्रिमेज वॉटर. पाणी जावे ही अपेक्षा माझी होती. छोटा पाईप आहे की मोठा पाईप आहे. मग हा आधी कोणी टाकला? मग त्याला काढायचा का? पाईप काढला तर त्याचे नुकसान कोण भरणार. वगैरे वगैरे सगळे मुद्दे आहे. पण तरीही काही गोष्टी नॅचरल कॅलॅमिटीज मध्ये करताना अशा छोट्या छोट्या गोष्टींचा मी म्हणत नाही की, तो महत्वाचे नाही किंवा त्याचा विचार केला नाही पाहिजे. परंतु, समितीने कृपया या सगळ्या कामाची भावना बघावी. ह्या भावनेपोटी प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी बघाव्या आणि त्या अडचणीतुन मात करून फक्त ह्या दोन आयटममध्येच रेट वाढलेले आहे. बाकीचे रेट हे मागच्यावर्षी प्रमाणे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, विषय असा आहे की, तुम्ही भावना शब्द बोलले आम्ही तुमच्या कामाशी एकदम सहमत आहोत. तुमच्या बोलण्यावरून पण सहमत आहोत. सर्व गोष्ट अशी आहे की....

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्या कामाशी मी सहमत नाही. सर्व पक्षी असेल मी नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आमच्याकडून मागणी करतात. डी.एस.आर. रेट परवडत नाही म्हणून मान्यता द्या. हे करत असताना तुम्ही ३०० पाईप टाकले. १५० पाईप काढले. आणि ह्या कारणामुळे काढले. हा सर्व अहवाल तुम्ही आम्हाला दिला पाहिजे होता. आता हे पाईप कुठे आहे? उद्या हे गटारात टाकतील म्हणजे तिकडे अडचण. सोसायटीच्या बाजुला टाकले तर तिकडे अडचण, जेव्हा प्रशासनाला वाटते डी.एस.आर. रेट पेक्षा जास्त दिले पाहिजे आणि स्थायी समितीला काय वाटते जे तुमच्या नियमात असते की, डी.एस.आर. रेटपेक्षा एवढे जास्त देता येते तर ते रेट द्या. आम्ही त्याची जबाबदारी कशाला घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ह्याच्यात आमची सुचना अशी आहे की, तुम्हाला मी आरोग्य विभागाचा इतिहास सांगतो. ७५ हजार रू. खर्च करून आपण एक एक फायबरच्या मुताऱ्या आणल्या. त्या मुताऱ्या आणायला आपल्याला फार त्रास झाला. म्हणजे पहिलाच तो कन्सेप्ट होता. आपण पहिलेच हे करत होतो. साहेब आज त्या मुताऱ्यांची संख्या किती? त्यांची अवस्था काय? आणि त्या कुठे आहेत? ह्याचा रिव्युव्ह अधिकाऱ्यांनी कधी घेतला का? कारण जवळ जवळ त्याच्यातल्या अर्ध्या पेक्षा जास्त मुताऱ्या उलट्या सुलट्या पडून फुटून तुटून पडलेल्या आहेत. इथे बसलेल्या बहूतेक नगरसेवकांच्या वॉर्ड मध्ये असतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब ते कचऱ्याचे काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

ते पेग्विन आहे. डॉ. बावसकरांनी ३० लाख रू. चे पेग्विन आणल्या. तेव्हा आम्ही स्थायी समितीला सांगितले तुम्ही स्टीलच्या टाक्या बनवा. साहेब लोकांनी ॲटम बॉम्बनी फोडले. आम्ही सुचना केली होती की, तुम्ही स्टिलच्या टाक्या आणा. पेग्विन साडे तीन हजार रू. बसली. स्टिलची टाकी १८००/- रू. बसत होती. म्हणजे दोन टाक्या एका पेग्विन मध्ये येत होत्या. त्या सुद्धा मेटलच्या असल्याकारणाने लाँग लाईफ, जशा ठाण्याला लावल्या. एक फायबरच्या मुताऱ्या आजही सगळीकडे वाकड्या तिकड्या पडलेल्या आहेत. ना धड त्याला सरळ करण्याची पडलेली आहे. ना. त्याची रेपेरिंग करून व्यवस्थित केल्या. ७५ हजार रू. म्हणजे काय होते. तेथे टॅक्स डीपार्टमेंट वाल्यांना ७५ हजार रू. कमवायला काय काय करायला लागते आज हे जे म्हणतात. तुम्ही हे जे पाईप काढलेले आहेत. तुम्हाला वाटले काढावे तर काढले. पण आपल्या त्या ठिकाणी ज्या पाण्याच्या टाक्या आहेत. तिकडे ते नेउन स्टॉक केले का? ते आपल्या ताब्यात घेतले.

**मा. आयुक्त :-**

हा मुद्दा महत्वाचा आहे. आणि त्याच्या बद्दल मी प्रथम फ्रॅन्कली सांगतो, आम्ही सगळे हे माइंड केलेले आहे. पण मी आता समितीला हे सांगू इच्छितो की, जी काही नविन पाईप घेतले त्या सगळ्यांचा हिशोब ठेवला जाईल. त्यापैकी कुठे कुठे बसवले त्याची आपण जंत्री केली जाईल. आणि जुने पाईप मी बघितलेले आहेत. ते खरच खराब आहे. अर्धे तुटलेले आहेत. अर्धे सगळे बाहेर आलेले आहेत. ते जुने पाईप काढलेले आहेत. समजा, पाण्याची टाकी असेल तिथे ग्राउन्ड असेल तिथे ते स्टॉक ठेवण्यात येतील. आणि नविन पाईपचा ए टू झेड हिशोब देण्याची जिम्मेदारी संबंधित आरोग्य डिपार्टमेंटला राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

त्या पाईपला ॲल्युमिनियमचा नंबर टाका. त्याच्यात रेल्वेला तसा पार्ट आहे. ऑईल पेंटने नंबर टाकतात. कारण ते म्हणतात, त्याच्यातले म्हणणे बरोबर आहे. आम्ही बघतो.

**मा. आयुक्त :-**

मी सदस्यांच्या भावनेशी सहमत आहे. काढले टाकले ठिक आहे. प्रॅक्टीकली जसे होते केले. पण त्याचा हिशोब ठेवा. किती व्यासाचे आले? किती आले? कुठे ठेवले? आणि मी तुम्हाला सांगू इच्छितो की, मी त्यांच्याशी सहमत आहे की, हे आणलेले पाईप सगळेच वापरले जातील. असे नाही. बाकीच्या पाईपमध्ये आपले पुढचे वर्ष जाईल आणि बहूतेक पुढच्या नाले सफाईला पाईप मागवायची गरज लागणार नाही. हेच पाईप आपल्याला कामी येतील. ह्या मताचा मी आहे. त्यामुळे आता सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्याच्यावर काय ऑईल पेंट टाकायचे असेल ते टाका. नाहीतर आपण बोलतो तसे करा. नंबर टाकून घ्या. माझी काही हरकत नाही. पण त्याची जर इन्वेंटरी ठेवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त साहेब, अजुन काही प्रमाणामध्ये पाईप टाकायचे बाकी आहेत. आणि जिथे आवश्यकता आहे तिथे खरोखरच टाकायला पाहिजे. कारण तुम्ही आता म्हणालात ना की, जिथे क्रॉस करायचे असते त्याठिकाणी गरजेचे आहे. मला वाटते की, माझ्या प्रभागात पाईप टाकायचे अजुन बाकी आहेत. अजुन तिथे पडले नाही. मी बऱ्याच दिवसापासून फोन करते. पण मला अजुन पाईप मिळालेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. आपल्याला तसेही टाकता येतील. मी सभागृहाला पुढे सांगू इच्छितो की, आपण भविष्यात पुढे काय करणार? हे पाईप आपण २-२, ३-३ गरजे प्रमाणे टाकलेले आहेत. ते काय शेवटपर्यंत तिथे राहणार नाही. त्यातले परत जे काही महत्वाचे रोड आहे. महत्वाचे क्रॉसिंग आहेत. तिथे आपण लगेच कन्वर्ट घेण्याच्या

प्रोग्राम करत आहोत. आपल्याच मान्यतेने मे बी इन नेक्स्ट थ्री, फोर मन्थ. तर त्यावेळी आपल्याला तिथे कन्वर्ट करताना ते पाईप काढायचे आहे. पानपट्टे साहेब, ते परत बांधकाम विभागावर ठेवणे त्यांनी परत ते पाईप गुत्तेदाराला दिले. असा काही प्रकार होता कामा नये. तिकडे बांधकाम विभागाला कन्वर्ट करा नाही तर हावडा ब्रिज बांधा म्हणावे. आपले आपले पाईप तुमच्या ताब्यात मला पाहिजे. पाईपचा हिशोब तुम्ही ठेवायचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, शेवटचा विषय जो राहिला आहे. स्थायी समितीने फेरविचार करून निर्णय घ्यावा. भारतीय जनता पक्षाचे माझे सहकारी सहमत असतील. तर आमचे मत आहे की, डी.एस.आर. रेट पेक्षा जास्त देता येते. हा निर्णय प्रशासनाने घ्यावा. आमच्यावर लादू नका. उद्या कोणी कोर्टात गेला.....

**दिपक खांबित :-**

गेल्या वर्षी पण डी.एस.आर. चे रेट हे जास्त दिले होते.

**मा. आयुक्त :-**

समितीने गेल्या वेळेला डी.एस.आर. पेक्षा १० टक्के वाढीव द्या. असा निर्णय घेतलेला आहे. तरी त्या १० टक्के च्यावर प्रशासनाला घेता येते की नाही आय एम नॉट अवेअर. हा विषय इकडे कशाला आणता? ठिक आहे. समितीने सांगावे की, आयुक्तांनी निर्णय घ्यावे. तर मग मी निर्णय घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, तुम्ही निर्णय घेतला पण तुमचे दहा लाख रू. पेक्षा जास्त बिल बनले. मग तुम्ही निर्णय कसा घेणार?

**मा. आयुक्त :-**

आता, तुम्ही मला अधिकार द्याल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तेच तर सांगतो की, आम्ही तुम्हाला निर्णय घेण्याची ॲथॉरिटी दिली आणि समजा दहा लाख रू. पेक्षा जास्त झाले. तर काय करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ही पद्धत काय होते. तुम्हाला बोललो ना की, मिटींग होते. ५ तारखेला आणि ७ तारखेला जाहिरात निघते. सर्व तयारी असते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या गोष्टीची गरज आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी गरजेचे कुठे बोलतो. ह्यात गरजेचे कुठे आहे? तुम्ही ठराव करा. तुम्हाला डी. एस. आर. रेट पेक्षा जास्त करायला ठराव करायला सांगितले ना. मग करा ना मी कुठे बोलतोय. मी का बोलतो. तुम्ही डी.एस.आर. रेट पेक्षा जास्तचा ठराव करा ना.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, आपण ह्या गोष्टीला विरोध करत नाही. मी तुम्हाला तुमच्या माहिती साठी सांगतो. तुम्ही काय ऐकले ते मला माहिती नाही. पण ते विरोध करत नाही. पण जिथे टेक्नीकल पॉईंट येतो. त्याला आपण आपल्या अंगावर घेणार का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

नोंद घेणे ह्यांचे काम आहे. घेत नाही ही गोष्ट खरी आहे ना.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे का घेत नाही? आपण सर्व नगरसेवक प्रोसिडींगचे शब्द टू शब्द वाचत नाही. आणि ह्यांची प्रोसिडींग मंजुर आहे. हे त्या प्रशासनाला उचित वाटत होते की, डी. एस. आर. रेट पेक्षा जास्त देता येते. आमची मंजुरी घ्यायची काय आणि मा. आयुक्त साहेब यांच्याकडे जायचे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य गारोडीया साहेब, ह्यात दोन गोष्टी होत्या एक वरती होता आणि ह्यापुर्वी आपल्याकडे विषय आला होता.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला असे झाले, त्यांनी काय सांगितले की, डि.एस.आर. रेटबाबत साहेब, पहिली गोष्ट अशी की, तुम्हाला चुक कुठे झाली ते सांगतो. समजा आता ह्यांनी पाईप प्रती नग २४४७ रू. त्या गोषवाऱ्यात त्यांनी ते दिलेले नाही की, त्याचे ट्रान्सपोर्टेशन पाईपची मुळ किंमत २०००, ट्रान्सपोर्टेशन २०० रू. मजुरी २४७ रू. असे मिळून २४४७ रू. होतात. साहेब, हे एक कोष्टक असते. तुम्हाला मी सांगितले की, ५० लाख रू. ची वस्तु खरेदी करायची आहे. तुम्ही काय बोलाल की अरे ५० लाख रू. आता काल त्यांनी टीपणी आणली. तर तुम्ही काय बोललात की, मला हे फिगर मोठे वाटतात. मग आम्हाला नाही वाटणार. पण त्याची डीटेल द्या

ना. तुमच्याकडे सगळी मशिनरी आहे. क्लार्क आहे, कम्प्युटर्स आहेत, सगळ आहे. तुम्ही जरा व्यवस्थित द्या. एक पाईप अमुक अमुक एवढ सगळ मिळून विथ डिलेवरी वगैरे सगळ करून लेबर सकट एवढे एवढे झाले. साहेब, तुम्ही मगाशी बोललात ना गेल्यावर्षी ठरलेले रेट साहेब असे नाही. गेल्यावर्षी स्थायी समिती सभा झाली. त्याच्यात अनेक वादग्रस्त निर्णय झाले आहेत. ते आता आम्ही एक एक पुढे आणतो. पूर्ण वर्षभराच्या स्टँडींगच्या ठरावाचे वाचन करतो. बेकायदेशिर काही ठराव केलेले आहेत. ते आमचे काम आहे. ते आम्ही करू पण उद्या तुम्ही बोलाल की, गेल्या वेळेला स्टँडींगने ह्या टेंडरला मंजुरी दिली. जसे काल आपण बसलो होतो. बाजार लिलावाचे सुरू झाले. दोन व्यक्ती बोलले गेल्यावेळेला आम्हाला अलाउड केले. अहो ते अलाउड न करता तुम्ही पहिलाच किक आउट केले पाहिजे. तुम्ही बाहेर बसा. तुमचा काही संबंध नाही. काय असते की, मी काय बोललो असतो तर वाद झाला असता. साहेब, टेंडरची प्रक्रीया तशी नसते. उद्या कोणी सोने, ठोमे, गोमे येवून बसतील. तुम्ही जेव्हा त्याचा लिफाफा रद्द करता तेव्हा त्या माणसाला रद्द करता. त्या माणसाने तिकडे पार्टीसिपेंट केले नाही पाहिजे. काल त्यांनी सांगितले ना की, साहेब, तुम्ही त्याला नाही बोलता. त्याला गेल्यावेळेला आम्हाला यस करून पार्टीसिपेंट करून दिले होते.

**एस. ए. खान :-**

अशीच पद्धत चालते. त्याच्यामुळे तेच करतात.

**मिलन म्हात्रे :-**

असे आहे. असे तुम्ही बोलले की, गेल्यावर्षी झाले म्हणून ह्यावर्षी करायचे. नाही. साहेब, गेल्यावर्षी ह्याच सभागृहामध्ये ३० लाख रू. चे म्हणजे ३ लाख रू. चे वर्षाला भुदंड पडेल असे फ्युल चार्जेस वगैरे मंजुरी मिळाले. अधिका-यांची गाडी असो नसो तर समोर राहिला त्याचे काय दिवसभर फिरायचे काम असो नसो त्यांना मंजुर केले. म्हणजे गेल्या स्थायी समितीने तीन लाख रू. ला मंजुरी दिली. म्हणून आम्ही ३० लाख रू. ला द्यावी. असे होते का? नाही. त्यांची चुक काय की, ते शेवटपर्यंत मंजुर करत नाही. की, आमचे हे चुकले आम्ही ह्या पुढे असे असे शेड्युल लावून देवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, होणार पण नाही.

**मा. आयुक्त :-**

रेट चा ब्रेक अप का नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी वरती दिले. इंधन वगैरेचे हे सगळ व्यवस्थित कोष्टक दिले. २५० रू. प्रति तास. आता डी.एस.आर. रेट आहे. ५७ रू. ७५ पैसे. १० टक्के वाढवून ६३ रू. ५० पैसे बरोबर आहे. आता साहेब, ६३.५० रू. आणि २५० रू. मग त्यांनी काय करायला पाहिजे. आम्हाला सांगा ना. ह्याचे तासाला डिझेलचे चार्जेस एवढे आहे. आता डिलीव्हरीचे काय आहे मला सांगा वाहतुक खर्च तो एक लावा. तो एक लावून तुम्ही फिटींग वगैरे करणार आहात. आता २५० रू. हा बिग फिगर वाटतो ना. तुम्ही जर कोष्टक दिले असते एक मशिन त्याला दिवसाला लागणारे इंधन साधारणतः ऑन ॲन ॲव्हरेज एवढे आहे आणि त्याचे डिलीव्हरी चार्जेस पटकन मजुरी मिळाली असती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या डी.एस.आर. रेट पेक्षा रेट देता येते. हा निर्णय प्रशासनाने घ्यावा. मा. आयुक्त साहेबांनी घ्यावा आम्ही ह्याच्यात ठराव पण मांडणार नाही. आणि आम्ही जर ठराव मांडला तर आमची सुचना हिच राहील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आता समजा ह्यांनी सांगितले की आम्ही डी.एस.आर. रेटलाच मंजुरी देणार आणि हा ठराव पास केला मग तुम्ही कॉन्ट्रॅक्टरला बिल कुठल्या हिशोबाने देणार.

**मा. आयुक्त :-**

ह्या पुर्वीचा समितीचा निर्णय असा आहे की, डी.एस.आर. पेक्षा १० टक्के जास्तीने मंजुरी. त्यामुळे आता १० टक्के पेक्षा २० टक्के करायचे किंवा नाही करायचे. एवढाच प्रश्न आपल्यासमोर आहे. आम्ही तर डी.एस.आर. रेट पेक्षा १० टक्क्याने देणार ना. पण त्यापुर्वी सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीयाने सांगितल्याप्रमाणे प्रशासनाला जर काही अधिकार असतील आणि ते जर १० लाख रू. च्या आतमध्ये असेल तर मी त्याबद्दल नक्कीच त्याचा थोडा फार फायदा करण्याचा प्रयत्न करणार. मग दहा लाख रू. च्या पुढे असेल. तर मी परत समितीकडे येणार की, असे असे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

राहून परत परत तिथेच येणार ना. साहेब तुम्ही आता निर्णय घ्या. तुम्ही आम्हाला आज जे समजवाल की, मार्केटचा रेट काय आहे. बरोबर आहे. स्टील वाढले, सिमेंट वाढले ट्रान्सपोर्टेशन वाढलेले आहे आणि तुमच्या प्रशासनाने क्लिअर कट परमिशन दिलेली आहे. तुम्ही आता बोलले की, मी बघतो. पण येथे असे म्हटलेले आहे की.....

**मा. आयुक्त :-**

मी आपल्या सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही कितीलाही परमिशन द्या. आपल्याकडे काही गोष्टी आपण साम, दाम, दंड, भेद ने करतो. त्याप्रमाणे ही गोष्ट होईल तो काही कुठे पळून जाणार नाही. आणि आपण सांगेल ते बिल घेईल तथापी असे करताना सुद्धा त्याला अन्याय झाला नाही पाहिजे. हा आपला साधा सरळ उद्देश आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सजेशन द्या ना आम्ही ठराव करतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण आता म्हणतो इमरजन्सी आहे. घाई आहे. सगळ आहे. साहेब, २३ एप्रिल ला ह्यांना त्याची मंजुरी मिळाले. अत्यावश्यक बाब म्हणून तुम्ही तिकडे सुट्टीवर जायच्या अगोदर ह्या मंजु-या घेतलेल्या आहेत. मग तुम्ही गेलात. बरोबर आहे. १८ मे रोजी आमच्यासमोर हा विषय आला. २३ एप्रिल ते १८ मे आपल्या प्रशासनाने एवढे दिवस काय काम केले ते सांगा. इमरजन्सी एवढी वाटत होती तर , तीन दिवसात त्यांनी टेंडरची प्रोसेस वगैरे करायची होती. साहेब, हे नविन नाही. गेल्यावर्षी होते तेवढेच आहे. जास्त थोडे फार फिगर इकडे तिकडे आहे. पण आज जवळ-जवळ २० दिवस गेले. तुमचे २० दिवस ऐन मोक्याचे कामाचे आपण जे म्हणतो ना पीक आवर्स म्हणतो. ते फुकट गेले ना. तुम्हीच लावलेले परिपत्रक आहे. निवडणूक आयोगाची मंजुरी आहे. २३ तारखेला मिळाली की नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दि. १०/०४/२००८ ला मा. महासभेची मंजुरी मिळालेली आहे. दि. १७/०४/२००८ ला आचारसंहिता लागू झाली आणि आपण लगेच निवडणूक आयोगाला पत्र दिले. दि. २२/०४/२००८ रोजी इलेक्शन कमिश्नर कडून मंजुरी मिळालेली आहे. आणि आपण लगेच २५ तारखेला निविदा काढलेल्या आहेत. आणि त्या ६ तारखेला प्राप्त झालेला आहे. १३ तारखेला वाटाघाटी झालेला आहे. आणि लगेच १७ तारखेला विषय आणलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

निवडणूक आयोगाची आचार संहिता कधी संपली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

२५ तारखेला आचारसंहिता संपली.

**मिलन म्हात्रे :-**

२५ तारखेला संपली ना. त्याच्यानंतर तुम्ही २६ तारखेला स्थायी समिती सभा लावू शकत होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

निविदा काढायची प्रोसिजर असते ना. निविदा काढल्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आता बोलला ना की, २५ तारखेला निविदा काढली मग १ तारखेला मिटींग लावू शकत होता. २ तारखेला लावू शकत होता. साहेब, मी मे महिन्याची गोष्ट करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दि. ०६/०५/२००८ रोजी निविदा प्राप्त झाल्या. साहेब आल्यानंतर दि. १३/०५/२००८ रोजी वाटाघाटी झाल्या. लगेच दोन दिवसानंतर मिटींग लावली.

**मिलन म्हात्रे :-**

त्या वाटाघाटी मध्ये वाटा राहतो बाजूला आणि घाटा होतो जास्ती. प्रत्येक टेंडर मध्ये वाटाघाटी. हा काय प्रकार आहे. तुम्ही कशासाठी टेंडर मागवता. रेल्वेमध्ये वाटाघाटी होत नाही. तिथे सुद्धा मोठे अब्जो रू. चे कामे होतात. रेल्वे, बी.एम.सी. ला वाटाघाटीचे प्रकार नसतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मी तुम्हाला बोललो ना. टेंडर आधी प्रत्रकारांकडे पोहचते. फक्त इकडे खानापुर्ती आमच्याकडे. ह्यामध्ये दुसरे ठेकेदार इनव्हॉल्व होवू नये म्हणून मुदत चार दिवसाची देतात. कारण त्याच्यात कोणी नविन ठेकेदार येवू नये म्हणून हे सर्व कारस्थान आहे. दि. ०६/०५/२००८ तारखेला मिटींग होते. आणि ८ तारखेला वर्तमान पत्रात येते. एवढी घाई एक आठवडा पण लागत नाही.

**मा. आयुक्त :-**

सर आता घाई नाही केली तर म्हणता की, घाई का नाही केली? आणि आता घाई केली तर म्हणता घाई केली.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा. टेंडर देताना तुम्ही टर्म्स टाकता ना की, अनुभव पाहिजे आणि मग त्या घेणा-या माणसाला टेंडरचा अनुभव असुन सुद्धा काही चुक केली तर, त्याच्यावर कार्यवाही काय तर शुन्य. मग अनुभवाचा फायदा काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ज्या विषयाची घाई असते ना. या महानगरपालिकेत कोणत्याही नगरसेवकाने कोणत्याही सदस्याने विरोध केला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही अडचण कधी आणत नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण यापुढे काळजी घेवू. अशी अननेसेसरी घाई पण होणार नाही. आणि अननेसेसरी लेट पण होणार नाही. ह्याची आपण व्यवस्था करू. फक्त आता ही वस्तुस्थिती आहे की....

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेबांनी आता फक्त रूलिंग दिले पाहिजे. तुम्ही गप्प बसुन चालणार नाही.

**मा. सभापती :-**

आता ठराव वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव नाही. आता ह्यांनी जी एवढी चर्चा केली आम्ही एवढ्या सुचना केल्या. त्याच्यावर तुमचे रूलिंग काय? त्यांचा ठराव असा असणार की, ठेकेदाराला संगळ देवून टाका.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही ह्यांना सांगा पाईप काढलेले आहेत.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेबांना मी एवढ सांगतो की, आत्ताच्या आता स्थायी समितीच्या सभासदांपुढे ज्या लोकांनी साफसफाईचे टेंडर पकडले. तेवढ्यांच्या कॉप्यांची फाईल घेवून यावे. ह्याच्यापुढे काय चर्चा करायची ते मी करतो. हे चालू द्या. आणि जेवढ्या लोकांनी १९ टेंडर जे भरलेले आहेत त्या फाईल इकडे आणून दाखवावे. काय अबाउ, बिलो आहे आणि जे ठेवलेले आहेत ते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे व विविध क्षमतेचे सक्शन मशिन यांचे भाडे याबाबत निविदाकराने सादर केलेले दर व सध्या चालू बाजार भावाशी तुलना करुन तसेच पेट्रोल / डिझेलची झालेली वाढ हे विचारात घेवून तसेच अत्यावश्यक बाब असल्याने एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे कामी मे. गणेश डेव्हलपर्स व सक्शन मशिन पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले खालील सर्वात कमी दर स्विकारणेस सभा मंजुरी देत आहे. व सदर टाकलेले पाईप याचा लेखाजोखा ठेवावा व पाईपवर नंबर टाकावेत. बांधकाम विभागाने पाईप काढल्यास सदर पाईप आरोग्य विभागाच्या ताब्यात देणे.

| आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन जे.सी.बी. मार्फत बसविणे | दर |
|---|---|
| १ फुटी व्यासाचें पाईप | रु. २,४३७/- प्रती नग |
| २ फुटी व्यासाचें पाईप | रु. ५,६८७/- प्रती नग |
| ३ फुटी व्यासाचें पाईप | रु. १०,०७५/- प्रती नग |

| सक्शन मशिन इंधन, लेबर, वाहतुक खर्चासह पुरवठा करणे | दर |
|---|---|
| ५ हॉर्स पॉवर | रु. २५०/- प्रती तास |
| १० हॉर्स पॉवर | रु. ३००/- प्रती तास |
| १५ हॉर्स पॉवर | रु. ३२५/- प्रती तास |

**राजु भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा सुद्धा ठराव आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण आमचा ठराव आहे ना. आमचा त्याच्यात विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी पण सूचना आहे.

**शरद पाटील :-**

आमचा ठराव घ्या.

**मा. सभापती :-**

मला काय माहिती की तुमचा ठराव आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, नेहमी मा. आयुक्त साहेबांच्या बाजुला बसलेले आहात. त्यांचा ठराव प्लेन आहे. मा. आयुक्त साहेबांनी जी सुचना केली आम्ही ज्या सुचना केल्या. त्या ठरावामध्ये अंतर्भुत असल्या पाहिजेत. असे काय करता? मी तुम्हाला पहिलाच बोललो होतो की, ह्यांच्या ठरावात काहीच नसणार आणि ते नव्हते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्ही जो ठराव मांडला ना, तो प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मांडलेला आहे. हा आमचा ठराव नाही. प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे. त्यानुसार आम्ही ठराव मांडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बंधन नसते ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जे रेट ह्याच्यामध्ये त्यांनी दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बंधन नसते. प्रशासनाने ५ लाख रू. दिले. असते ह्या मिटींगसाठी असते ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शेवटी प्रशासनाने काय लिहिले.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने गोषवारे घरी पाठवलेले होते. ठराव देवूनच पाठवायचे होते. मिटींगची पण गरज नव्हती.

**शरद पाटील :-**

साहेब, आमचा ठराव घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आमची सुचना घ्या. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब बोलले त्याला आम्ही सहमत आहोत. ही चर्चा झाली. चर्चेमध्ये मा. आयुक्त साहेबांनी असे असे जे आदेश दिले. ते आदेश त्याच्यात अंतर्भुत करावेत.

**शरद पाटील :-**

आर.सी.सी. पाईप व सेक्शन मशीन निविदा दरात व डी.एस.आर. सध्या चालू बाजार भावाशी तुलना करुन व अभिप्राय मागितला असता याकामी निविदाकाराने सादर केलेले दर हे वाजवी बाजार भावाशी तुलना करता योग्य असल्या बाबत बांधकाम विभागाने कळवले असले तरी, प्रशासनाने यावर निर्णय घ्यावा. कारण डी.एस.आर. पेक्षा जास्त किंमत देता येते किंवा नाही यांचा निर्णय शासनाने घ्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अत्यावश्यक सेवा नाही. अत्यावश्यक कार्यवाही होती ती केली. पूर्ण केली. कारण त्या वेळेला गरज होती. आणि त्याच्यावर चर्चा उपस्थित झाल्यावर मा. आयुक्त साहेबांनी काही आदेश दिलेले आहेत ते त्या गोषवाऱ्यात नव्हते. त्या सुधारणा आणि सुचना त्यांच्यासहीत हा ठराव त्या सब्जेक्ट टू कंडीशन आम्ही मंजुरी देवून टाकतो. विषय संपला. साहेब, आम्हाला काय हे अडवायचे नाही. साहेब, तुम्ही त्यावेळेला बोललेले होते. म्हणून आम्ही मंजुरी दिली. आदल्या दिवशी या विषयावर चर्चा झाली होती. आपल्याला आठवते ना एकाच विषयासाठी सभा होती. आणि तो ठराव वाचून कायम करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, इतिवृत्तांताची पाने फिरवली तर दोन गोष्टीचा येथे खुलासा करायचा आहे. एक ३२ नंबरचा जो अवलोकनार्थ आहे. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील न्यु भारत इंडस्ट्रीयल पासून अे.के. सिरॅमिक पर्यंत सर्व्हिस रोडवरील दोन्ही बाजुला माती भराव करणे आणि कोठार झोपडपट्टी, अन्ना नगर झोपडपट्टी, जय अंबे नगर झोपडपट्टी, गांधीनगर इत्यादी ठिकाणी स्ट्रीट लाईट लावणे. स्ट्रिट लाईट आपण लावली, रिलायन्सची आहे की कोणाची आहे? ह्याचा खुलासा झालेला नाही.

**दिपक खांबित :-**

आपण जे लाईट लावतो ना. तेच प्रस्ताव पण आणतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जर लावली तर ह्याची इलेक्ट्रीक कनेक्शन करणार त्याचे बिल कोण भरणार? हे बोर्ड त्याच्यात रिलायन्समध्ये घेणार का?

**दिपक खांबित :-**

नाही. जिथे रिलायन्स बोर्ड लावत नाही तिथे आपण बोर्ड लावतो ३ मीटरपेक्षा जे कमी रस्ते असतात झोपडपट्टीमध्ये म्हणा किंवा कॉम्प्लेक्स मध्ये म्हणा. तिथे स्ट्रिट लाईट आपल्या खर्चाने आपण लावतो. आणि त्याचे बिल आपणच भरतो. रिलायन्सचे बिल भरतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बिल कशापद्धतीने भरतो ते मी विचारतो.

**दिपक खांबित :-**

मिटर लावून बिल घेतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तिकडे मिटर आहे. साहेब, आता हे तीन मिटर बोलले. अनेक झोपडपट्टीमध्ये लोकांनी निवेदन केले की, आमच्याकडे रूंदी असते लावा. तिथे लावत नाही. म्हणजे परटीक्युलरली जे कोणी बोलतात. दादागिरी करतात त्यांच्याकडे लावतात. आता हे बोलतात मिटर अशा पद्धतीने अनेक ठिकाणी लावलेले मिटर नाही.

**मा. आयुक्त :-**

ते ठिक आहे. मिटरची. खात्री करा आणि आता सन्मा. सभासदांनी सांगितल्याप्रमाणे काही एरिया असतील तीन मीटरपेक्षा कमी असतील. परंतु, तिथे लोक राहत असताना सुद्धा लाईट नाही. असे ही कवर केले पाहिजे ते आपण सर्व करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते बोलतात की, तुमच्या पुढचे काम केले तर काय बिघडते.

**मिलन म्हात्रे :-**

दादागिरी कोण करते त्याचा पण तपास करा ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते तिथे कळले पाहिजे ना.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, कॉम्प्लेक्समध्ये काय नियम आहे?

**दिपक खांबित :-**

कॉम्प्लेक्समध्ये हँडओव्हर झालेले असतात ते आपण लावतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, मला खुलासा पाहिजे. किती अंतरावर स्ट्रिटलाईटचे बोर्ड लावले पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साईज प्रमाणे ५० वेटचे आहे. १२५ वेटचे असतील जनरली २० मिटरवर मेन रोडवर असेल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बरोबर आहे. असे जनरली काहीतरी ठराविक ठेवा. नियम ठेवा. येथे बोर्ड आहे पुन्हा तिथेच बोर्ड लावला तर ते चुकीचे आहे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सिरियल क्र. ५९ आणि ६०. त्या अवलोकनामध्ये आहे. दोन्ही पार्क, गार्डन, आर.जी. आहे. ह्याचे मी तुम्हाला पत्र दिले म्हणजे हे गार्डन कोणाचे आहे. आपण निश्चित करतो. आर. जी. आहे. महापालिकेला हँडओव्हर केलेले आहे. साहेब, मी पत्र दिलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, माझ्या वॉर्ड मध्ये जवळ जवळ १५ ते २० दिवस झाले. लाईटचे पोल बंद आहे. मी रिलायन्स वाल्यांना पण कळवले. आपल्या पालिकेला पण कळवले. तर ते चालू होत नाही. आपण ह्याचे बिल नाही भरले का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मी आपल्याला ह्याचे पत्र दिलेले आहे. हे गार्डन आपले आहे का?

**मा. सभापती :-**

पाणी गेले असेल.

**नयना म्हात्रे :-**

ते स्वतःहून बंद झाले. त्यांनी बंद केले तर गोष्ट वेगळी आहे. तर ते स्वतःहून बंद झाले आहे. मग ते चालू का करत नाही?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पावसाळ्यामध्ये गाड्या पण बंद होतात. आपण कार बंद करून टाकू या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, अवलोकनामध्ये दोन्ही आर.जी. आपल्या ताब्यात नाही आले. तर ह्याला जबाबदार कोण?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्या नयना म्हात्रे मॅडमने जो प्रश्न विचारला खरोखर त्याचे उत्तर मला पण पाहिजे. झोपडपट्टीमध्ये स्ट्रिट लाईटचे पोल बंद आहे तर ते का बंद आहेत?

**दिपक खांबित :-**

तुम्ही स्टँडींग मध्येच सांगता. तुम्ही असे कधी सांगितले नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नाही. मी पत्र व्यवहार केलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे पण त्याच्यावर पत्र आहे. जवळ जवळ एक महिना झाला.

**मा. सभापती :-**

तुम्ही पत्र कोणाला दिले?

**नयना म्हात्रे :-**

नगरपालिकेला दिले. कोणाला दिले म्हणजे त्यांच्या डिपार्टमेंटला माझे पत्र आहे. महिना झाला. लोक टॅक्स भरत नाही. त्याच्या शिवाय मी मिटींगमध्ये बोलते का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ह्या मॅडम जे बोलतात ना ते बरोबर आहे. मी स्वतः सुद्धा ८ दिवस सतत फोन करत होतो.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, खांबित साहेबांनी अख्या मिरा भाईंदरचे काम केले. हे काय लपवण्याची गोष्ट नाही. हे एकदम जाहिर आहे. पण माझ्या वॉर्डमधले लाईटचे खंबे बंद आहे तर मी ते बोलायला नको का?

**मा. सभापती :-**

तुम्हाला माहित आहे मी मान्य करतो. तुम्हाला माहित आहे की, कमिशनर साहेबांनी युद्ध पातळीवर सर्व नाले सफाईचे काम घेतलेले. सर्व अधिकारी त्यांच्या बरोबर होते. मग, आणखिन कुठे कुठे लक्ष असणार. उद्या लाईट चालू होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, नाले साफसफाईसाठी माणस नेमलेली आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

जानकर नालेसफाईला कुठे होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, पोल बंद आहे. त्याचे रिपोर्टींग करायला माणस नेमलेली आहे. मग ते कुठे आहे. माझ्या वॉर्डमध्ये बालाजी नगरचा पोल बंद होता.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, माझ्या वॉर्डमध्ये १५ दिवसानी एक माणूस बघायला येतो. असे कसे चालेल.

**दिपक खांबित :-**

माणस येतात.

**नयना म्हात्रे :-**

नाही येत. विचारा तुमच्या माणसाला.

**मा. आयुक्त :-**

सिरियल क्र. ५९, ६० साठी आर.जी. चे असतील तर माझी सुचना राहिल की, आर.जी. चे प्लॉट असतील. तुम्ही जर गार्डन केले असतील तर संबंधित सोसायटी कडून कायम स्वरूपी बिना अट हस्तांतरीत केल्याचे पत्र घेउन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

ताबा पावती घ्या. हजार रू. च्या स्टँप पेपरवर घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी आपल्याला ह्या दोन्ही विषयाचे पत्र दिले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, गेल्या मिटींगला असा ठरावच मांडलेला की, नाले साफसफाई होईल गाळ येईल, माती येतील, दगड येतील. ते सुभाषचंद्र बोस मैदानमध्ये टाकायचे बरोबर. ते ठरावामध्ये लिहिले होते. त्या ठेकेदाराने टाकले का ते बघा? ठेकेदार माझ्यासमोर चोऱ्या करत होते. सुभाषचंद्र बोस मैदानाच्या बाजुला एवढी माती काढली दगड काढली, त्या सायमनने तर माझ्यासमोर चोऱ्या केल्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तिकडे ४० लाख रू. ची भरणी झाले.

**नयना म्हात्रे :-**

त्याच्यानंतर सुहास रकवी ने माझ्या समोर ट्रक भरून नेला. पाणपट्टे साहेबांना विचारा मी त्यांना फोन केला होता की नव्हता. तुम्ही त्या ठेकेदारावर काय कारवाई करणार ते आम्हाला महिला सांगा. सायमन, सुहास रकवी यांच्यावर कारवाई काय करणार? कारण मी तसा ठराव मांडलेला आहे. त्यांनी ठरावामध्ये तसे शब्द नमुद केले. त्याचा पहिला खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

मॅडम, आता भरपुर माती शिल्लक आहे. पर्टीक्युलर कनकियाच्या मागच्या साईडला ४-५ रोडवरती खांबित साहेबांना माझी सुचना राहिल की, आता ती माती इतरत्र ठिकाणी न टाकता इकडे टाका.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे झाले काय? साहेब, असे एक नाही ५०-५० लाख रू. च्या मातीच्या चोऱ्या झालेल्या आहेत. एक दोन नाही आता त्या सत्संगच्या तिथे माती टाकले. काल रात्री मी जावून बघुन आलो. तीच माती सुभाषचंद्र बोस मैदानात टाकली असती तर बिघडले असते का? तुम्ही ती त्याच्याकडून टाकून घ्या. आणि जे कोणी आहे त्याच्यावर फक्त बंधन घाला.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आपण कनकिया पोलिस स्टेशनच्या इकडून आणायला ट्रकचे भाडे लागणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आता काय होते. तुम्ही जे सांगितले ना तर तिकडून माती उचलणार दहा ट्रक तिकडून माती उचलणार एक ट्रक सुभाषचंद्र बोस मैदानात टाकणार. आणि ८-९ ट्रक दुसऱ्या साईडला जाणार.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये आपण माती गावात येउ देत नाही. आपण स्वतः नाक्यावरती खेत्रे साहेबांना बसविलेले आहे. त्यामुळे मातीची उपलब्धता भरपुर आहे. मॅडम थोडा पावसाळा कमी झाला आणि माती यायला सुरूवात झाली की, बरीच माती कोणीसुद्धा घेत नाही. ते आपण तिकडे डायवर्ट करू.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही सांगणार आमच्याकडे टाका म्हणून ते आमच्याकडे टाकणार. पण सध्या या ठेकेदाराने आपली माती विकली ना. मनात येतात आणि त्यांनी खावून टाकली का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये एका वर्षात ४३ लाख रू. ची भरणी झालेली आहे. मी आपल्याला पत्र दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तो वेगळा विषय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता ह्याच्यामध्ये माती भराव आहे. ९ लाख रू. ची माती भराव सर्व्हिस रोडवर आम्ही तेच विचारतो ना. जर तुमच्याकडे माती आहे. तर सर्व्हिस रोडवर ९ लाख रू. ची माती खरेदी करायची काय गरज होती?

**मा. सभापती :-**

सचिवांनी दोन्ही ठराव वाचून घ्यावे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव ध्रुवकिशोर पाटील यांचा आहे. त्याला अनुमोदन राजु भोईर यांचा आहे. दुसऱ्या ठरावाचे सुचक शरद पाटील आणि अनुमोदक ओमप्रकाश अग्रवाल यांचा आहे. प्रथम मी दुसरा ठराव मतास टाकतो. ठरावाचे वाचन करतो. आर.सी.सी. पाईप व सेक्शन मशीन निविदा दरात व डी.एस.आर. सध्या चालू बाजार भावाशी तुलना करुन व अभिप्राय मागितला असता याकामी निविदाकाराने सादर केलेले दर हे वाजवी बाजार भावाशी तुलना करता योग्य असल्या बाबत बांधकाम विभागाने कळवले असले तरी, प्रशासनाने यावर निर्णय घ्यावा. कारण डी.एस.आर. पेक्षा जास्त किंमत देता येते किंवा नाही यांचा निर्णय शासनाने घ्यावा असा मी ठराव मांडत आहे.

या ठरावाच्या बाजुस जे असतील त्यांनी हातवर करायचे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. पहिल्या ठरावाचे मी आता वाचन करतो. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे व विविध क्षमतेचे सक्शन मशिन यांचे भाडे याबाबत निविदाकराने सादर केलेले दर व सध्या चालू बाजार भावाशी तुलना करुन तसेच पेट्रोल / डिझेलची झालेली वाढ हे विचारात घेवून तसेच अत्यावश्यक बाब असल्याने एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे कामी मे. गणेश डेव्हलपर्स व सक्शन मशिन पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले खालील सर्वात कमी दर स्विकारणेस सभा मंजुरी देत आहे. व सदर टाकलेले पाईप याचा लेखाजोखा ठेवावा व पाईपवर नंबर टाकावेत. बांधकाम विभागाने पाईप काढल्यास सदर पाईप आरोग्य विभागाच्या ताब्यात देणे.

| आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन जे.सी.बी. मार्फत बसविणे | दर |
|---|---|
| १ फुटी व्यासाचें पाईप | रु. २,४३७/- प्रती नग |
| २ फुटी व्यासाचें पाईप | रु. ५,६८७/- प्रती नग |
| ३ फुटी व्यासाचें पाईप | रु. १०,०७५/- प्रती नग |

| सक्शन मशिन इंधन, लेबर, वाहतुक खर्चासह पुरवठा करणे | दर |
|---|---|
| ५ हॉर्स पॉवर | रु. २५०/- प्रती तास |
| १० हॉर्स पॉवर | रु. ३००/- प्रती तास |
| १५ हॉर्स पॉवर | रु. ३२५/- प्रती तास |

या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव मी बहूमताने मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. १७ :-**

आर.सी.सी. पाईप व सक्शन मशिन दराबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे व विविध क्षमतेचे सक्शन मशिन यांचे भाडे याबाबत निविदाकराने सादर केलेले दर व सध्या चालू बाजार भावाशी तुलना करुन तसेच पेट्रोल / डिझेलची झालेली वाढ हे विचारात घेवून तसेच अत्यावश्यक बाब असल्याने एन.पी.-३ आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे कामी मे. गणेश डेव्हलपर्स व सक्शन मशिन पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले खालील सर्वात कमी दर स्विकारणेस सभा मंजुरी देत आहे. व सदर टाकलेले पाईप याचा लेखाजोखा ठेवावा व पाईपवर नंबर टाकावेत. बांधकाम विभागाने पाईप काढल्यास सदर पाईप आरोग्य विभागाच्या ताब्यात देणे.

| आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन जे.सी.बी. मार्फत बसविणे | दर |
|---|---|
| १ फुटी व्यासाचें पाईप | रु. २,४३७/- प्रती नग |
| २ फुटी व्यासाचें पाईप | रु. ५,६८७/- प्रती नग |
| ३ फुटी व्यासाचें पाईप | रु. १०,०७५/- प्रती नग |

| सक्शन मशिन इंधन, लेबर, वाहतुक खर्चासह पुरवठा करणे | दर |
|---|---|
| ५ हॉर्स पॉवर | रु. २५०/- प्रती तास |
| १० हॉर्स पॉवर | रु. ३००/- प्रती तास |
| १५ हॉर्स पॉवर | रु. ३२५/- प्रती तास |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील    अनुमोदन :- श्री. राजु भोईर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. मॉरस रॉड्रिक्स | १ | श्री. ओमप्रकाश अग्रवाल | | |
| २ | श्री. मिलन वसंत म्हात्रे | २ | श्री. शरद पाटील | | |
| ३ | श्री. एस. ए. खान | ३ | श्री. प्रशांत पालांडे | | |
| ४ | सौ. शानू गोहिल | | | | |
| ५ | सौ. सुनिता पाटील | | | | |
| ६ | सौ. नयना म्हात्रे | | | | |
| ७ | श्री. गणेश शेट्टी, | | | | निरंक |
| ८ | श्री. तुळशीदास म्हात्रे | | | | |
| ९ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | | | | |
| १० | श्री. राजू भोईर | | | | |
| ११ | श्री. टेरी परेरा | | | | |
| १२ | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | | | | |
| १३ | श्री. प्रकाश ठाकुर | | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, जकात कर वसूलीचा कालावधी संपल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ह्याच्यात धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे की मा. महासभेला आहे.

**मा. आयुक्त :-**

हा विषय जरी आपण स्थायी समिती समोर आणला तरी त्याचा बेस मा. महासभेचा ठराव आहे. आपण मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. २९/०२/२००८ हा बघितला तर त्यामध्ये मा. महासभेने जे दर ठरवलेले

आहे. पुढच्या वर्षासाठी अफकोर्स टेंडर कॉल न करता टेंडर कॉल केल्यानंतर कमी जास्त होवू शकते. मी त्या बद्दल भाष्य करत नाही. त्यामुळे त्याचा बेस धरून आपण येथे विषय आणलेला आहे. मी स्थायी समितीला विनंती करेन की, हा मुद्दा उपस्थित केला चांगली बाब आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर आपण परत मा. महासभेमध्ये जावू. नाही तरी स्थायी समितीचे सगळे विषय मा. महासभेमध्ये अवलोकनार्थ असल्यावर जातातच. त्याही वर मा. महासभेसमोर ह्याला सॅन्क्शन घेण्याची कारवाई करता येईल आणि हा धोरणात्मक निर्णय आहे. मा. महासभेला अंधारात ठेवून स्थायी समितीच्या खांद्यावर बंदूक ठेवून काहीतरी करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न नाही. प्रशासनाने ह्याच्यामध्ये प्रामाणिक प्रयत्न एवढाच केला आहे की २२ तारखेनंतर एवढी मोठी जकातीची रक्कम विना वसुली राहू नये आणि महापालिकेचे नुकसान होवू नये.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तसे मला ही एक आठवते. मागे आमची स्थायी समिती सभा झाली. त्याच्यात हा विषय आणला नाही. आज आपण म्हणतो. २२/०६/०८ तारीख आणि आपली मा. महासभा १९ तारखेला लागलेय. आता ऑक्ट्रॉय चे मेन कोण आहेत? उपायुक्त आहेत ते हजर आहेत का? त्यांनी साहेब मा. महासभेला एवढा महत्वाचा विषय का घेतला नाही? एक आठवडा अगोदर आमची स्थायी समिती सभा लागली. त्याचा हा विषय आणू शकत होते. २२/०६/२००८ ला संपणार आहे. हे अगदी सुर्यप्रकाशा एवढे स्वच्छ आहे. ऑक्ट्रॉय बंद होणार ही चार महिने अगोदर पासून चर्चा आहे. म्हणजे तुम्ही त्याच्यावर कॉन्सनट्रेट राहिले पाहिजे ना. एक स्थायी समिती सभा फुकट घालवली. आता तुमचे दि. २२/०६/२००८ नंतर म्हणजे तुम्ही जे म्हणतात आमचा हा निर्णय जो होईल त्याच्यावर स्टीक अप राहणार आहे. हा निर्णय झाल्यानंतर तो मा. महासभेला जाणार. कारण, दि. २२/०६/२००८ ला तुम्हाला निर्णय घ्यायचा आहे. तुमची एक मा. महासभा फुकट गेली ना. साहेब, हा महत्वाचा प्रश्न आहे. ह्याच्यात करोडो रू. चे देणे घेणे आहे. आणि उपायुक्त साहेबांना त्याचे काय महत्व नाही. गाड्या घोडे सगळ ऑफिस सगळा स्टाफ आपले दोन कर्मचारी जातात. त्यांना टेलिफोन दिला तो चालू आहे की नाही. काय कळायला मार्ग नाही. मागच्यावेळी मोहन पाटील यांनी त्यांना एक गोल सिलच प्रदान करून टाकले.

**मा. आयुक्त :-**

मी जरा सर्व सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जर गोषवारा बघितला असेल तर, ह्याच्यामध्ये ३१ जुलै २००८ मध्यरात्री पासुन सेसची अंमलबजावणी करण्यात येईल. असे आणखी शासनाचे लेखी पत्र नाही. प्रशासन शासनाच्या लेखी कम्युनिकेशनची वाट बघत होती. परंतु, शेवटी शासनाची लेखी कम्युनिकेशनची वाट बघता बघता आपला वेळ पण निघुन चालला म्हणून ऐन वेळी हा विषय आणलेला आहे. मी समितीचे आभार मानतो की, समितीने पहिला प्रश्न हा विचारायला पाहिजे तुम्हाला कोणी सांगितले १ ऑगस्ट २००८ पासुन...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय मागच्या स्टँडींगमध्ये आला पहिजे होता. तेव्हा आम्ही विचारले होते.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांची सभागृहात विचारणा झाली होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते बोलले की, आमच्याकडे काही आदेश नाही आणि आम्ही तुम्हाला नंतर कळवू ते आले तर आम्ही त्यांना विचारले होते.

**मा. आयुक्त :-**

तीच परिस्थिती आज पण आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, महत्वाचे काय आहे की, त्यांचा मुद्दा आहे ना तो विषय संपला. त्यांनी विचारले तुम्ही सांगितले पत्र आले नाही. मान्य आहे. पण आपल मरण हे २२/०६/२००८ ला आहे हे नक्की आहे. मग तुम्ही तयारी केली पाहिजे की नाही. किंवा घरामध्ये लग्न आहे ते दि. २२/०६/२००८ ला आहे. ते नक्की आहे. फायनल आहे. मग तुम्हाला मिळाले किती दिवस? ते तुम्ही कॅल्क्युलेट करा. एक स्थायी मिळाली ती तुम्ही फुकट घालवली. ती स्थायी होउन ह्या मा. महासभेला आले असते तर तुम्हाला ते सोपे गेले असते. माझा बोलायचा दृष्टीकोन तो आहे. आता हे उपायुक्त वगैरे आहे त्यांना तुम्ही म्हणता नाले सफाई वगैरे ठिक आहे मान्य आहे. पण सगळीकडे काही बाबी क्षम्य नसतात. आता हा करोडो रूपयाचा डिसिझन आहे. ह्याच्याने बजेटवर परिणाम होतो. मागच्या वेळेला तुम्हाला सांगतो हे भिजत घोंगड पडले. त्याला मुदतवाढीसाठी कोर्ट बाजी झाली. सगळ झाले आणि शेवटला त्या ठेकेदाराला जास्त आमाउन्ट द्यायची ती बेकायदेशिर दिली. माझे त्याच्यावर पत्र आहेत. म्हणजे त्याच्यात महापालिकेचे नुकसान झाले आणि ते कोट्यानी झाले. लाखानी झाले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यात अकरा आयटम वर रेट वाढवून दिले. मा. स्थायी समितीवर ठराव झाला. म्हणजे ते वाट बघत होते की, ११ आयटम वरचा रेट चे नोटीफिकेशन काढले नाही. म्हणून ११ आयटम आहे. त्याच्यावर ९-१० कोटी रू. ची वाढीव मिळणार होती. ते ही नुकसान ह्याच्यामध्ये झाले.

**मा. सभापती :-**

वाढीव करू ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

१० आयटम्स आहेत. त्याच्यावर तुम्ही करू शकत नाही. तुम्ही देवू शकत नाही. तुम्ही त्याच्यावर नोटीफिकेशन काढलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब जे आयटम वाढवलेले आहे ते नेक्स्ट इयरसाठी वाढवलेले आहेत. ह्या इयर साठी नाही. आपण त्याच्यासाठी नविन टेंडर काढू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही काय बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, कसे आहे की, आपण त्यांना आता वाढ देणार आहेत. मा. आयुक्त सांगतो की, आपण त्यांना जी वाढ करून दिली ना तिथे वाढ झाल्याच्या दिवसापासून तिथे पैसे वसुल होतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने खुलासा करावा की, ही वाढ आपण कधी वाढवून दिली. ह्या इयर साठी की, पुढच्या इयर साठी.

**मा. सभापती :-**

पुढच्या इयरसाठी.

**मिलन म्हात्रे :-**

हे आपण म्हणता पण तुम्ही जरा ठराव वाचा. ते वसुली कसे करतात कोणाचे लक्ष आहे का? आपले ऑक्ट्रॉयवाले काय करतात? त्यांना तुम्ही इन्फॉरमेशन दिली का?

**मा. सभापती :-**

ते नाही सांगतात.

**मिलन म्हात्रे :-**

ते नाही सांगतात पण, आमच्याकडे पावत्या आहे ना. मा. सभापती साहेब, माझे म्हणणे असे आहे की, आपला ठराव झाला जर त्या अधिकाऱ्याकडे त्या ठरावाची प्रत गेली पाहिजे की नाही. की, ह्यात वाढ करून दिलेली आहे. आणि ही तुम्ही पुढच्या वर्षाकरिता आहे. तर ह्याची घ्यायची नाही.

**मा. आयुक्त :-**

हा जो जनरल बॉडीचा ठराव क्र. ३५ आहे. त्यात वाक्य असे आहे की, सदर जकात वाढीव दर दि. २३/०६/२००८....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तो नाही, मागच्या स्थायी समितीमध्ये सदर बजेट ज्यावेळी पास होतो ना, त्यावेळची गोष्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बजेटच्या वेळेला आम्ही ठराव केला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बजेटच्या वेळेला आम्ही ठराव केला होता. तो पुढच्या वर्षी ठेवा म्हणून.

**मा. आयुक्त :-**

हा मा. महासभेत आला होता.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याची नोटीफिकेशन केली पाहिजे होती.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्ही तुम्हाला अगदी सोपे सांगतो. ह्या ठरावात मोठा निर्णय झाला. तुमच्या उपायुक्तांनी कनसल्टींग आपले जे ऑफिसर आहेत. म्हणजे तिकडे कन्ट्रोल करण्याकरिता बसतात. त्यांनी रेट जास्त घेउ नये. लोकांना त्रास देवू नये. महापालिकेचे वे ऑफ महापालिका म्हणजे कमिशनर त्यांना तो ठराव पाठवला पाहिजे की नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ४२ आहे. दि. २९/०२/२००८ त्याच्यामध्ये सुद्धा तेच वाक्य आहे. सदरहू जकात वाढीव दर दि. २३/०६/२००८ पासुन लागू करण्यात येतील मग, असे असताना देखील त्यांनी दि. २३/०६/२००८ पूर्वी वाढीव दराने वसुली केली असे आपले म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तो ठराव डी.एम.सी ने त्यांच्याकडे कार्यवाही करिता दिला आहे की नाही.

**मा. आयुक्त :-**

ते नाही म्हणतात. आपण त्याची खात्री करून घेवू.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला त्याची प्रत आली का? आपल महापालिकेचे ऑफिस आहे. ऑक्ट्राय च्या संबंधितले सगळे ठराव तिकडे आहेत का? तुमची जी दरसुची आहे. त्या दरसुचीमध्ये दोन स्टँडींग, एक मा. महासभा आणि एक स्टँडींगच्या ठरावाचा उल्लेख केलेला नाही. साहेब, दरसुची मी शोधून काढलेय. तुम्ही कधी तसे कळवले का? ठराव चार झालेले मागच्या पानावर ठरावाचे सगळे उल्लेख केले. त्याच्यात मी ह्या ठरावाचे बोलत नाही. जे प्रिंटींग झाले त्याच्या अगोदर तुमची दरवर्षी दरसुची अद्यावत प्रिंट होते. त्याचा ह्याच्यात उल्लेख नाही. साहेब, त्याचे इकडे वाद होतात. आमच्या नगरसेवकांबरोबर वाद होतात. आम्हाला माहित आहे की, ठराव झालेले असतात पण त्या ठरावाचा उल्लेख नाही.

**मा. आयुक्त :-**

दि. २३/०६/२००८ पासून आपल्या सुचनेप्रमाणे नॉट ऑनली ठरावाचा उल्लेख केला पाहिजे तथापी बोर्डच लावून टाका ना की, स्थायी समिती ठराव क्र. ... मा. महासभा ठराव क्र. ...प्रमाणे खालील प्रमाणे रिवाईज दर झालेले आहेत, सर्वांच्या माहितीस्तव.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही सुचना आपली जुनी आहे. आम्ही कधीपासुन सांगतो पण कोणी करत नाही. बोर्ड पण लावत नाही. साहेब, ह्याच्यापेक्षा आणखिन चांगल्या सुचना दिल्या होत्या. आपल्या महानगरपालिकेच्या अधिकारी पासून बोर्ड लावणार होते की, जर तुमच्या जकात वसुलीमध्ये काही तक्रारी असतील तर, तुम्ही ह्या संबंधित अधिकाऱ्याला भेटावे. तरीसुद्धा बोर्ड लागले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ऑफिसर बसतात पण कोपऱ्यात लोकांनी बघु नये म्हणून.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. मी स्वतः इनशुअर करतो की, हे दोन्ही बोर्ड लागतील एक तर दर चे किंवा तक्रार असेल तर माझ्या स्वतःच्या मोबाईल वर मला संपर्क साधावा.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकाऱ्याचे केबिन हे पुर्वी बाहेर होते. ते आता नेउन कोपऱ्यात टाकले. जेणेकरून पब्लिकला दिसू नये. तुमचा बोर्ड कोपऱ्यात असणार, फोन नं. कोपऱ्यात असणार...

**मा. आयुक्त :-**

समोर लावू.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही पुर्वी रस्त्यावर बसत होता ना. मेन रोडला आता कुठे आतमध्ये बसता ना.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, ह्याच्याबद्दल लेटेस्ट काय म्हणजे कधीपासुन सुरू होईल, काही माहिती मिळेल का?

**मा. आयुक्त :-**

लेटेस्ट जे आहे ते आपल्या गोषवाऱ्यात दिलले आहे. आणि आणखिन आम्ही लेटेस्ट शासनाकडे दररोज पाठपुरावा करत आहोत. शासन कॅबिनेट निर्णय झालेला आहे. कॅबिनेटच्या निर्णयात त्यांना आणखिन काही अमेनमेन्टस ॲक्ट मध्ये करायचे आहे. अमेनमेन्ट सह कॅबिनेट निर्णयासह त्यांचे एकदा क्लॅरीफिकेशन झाले की, ते फतवा काढणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

१ ऑगस्ट पर्यंत कठिण वाटते ना.

**मा. आयुक्त :**

फतवा निघेपर्यंत आपले नुकसान होवू नये म्हणून हा सोपा ....

**शरद पाटील :-**

१ ऑगस्ट च्या नंतर पण मुदत वाढ होईल का?

**मा. आयुक्त :**

काहीच  सांगता येत नाही. तुम्हाला तेच सांगतो.

**शरद पाटील :-**

काही सांगता येत नाही म्हणून विचारतो. कारण लोक आम्हाला विचारतात.तेंव्हा त्यांना उत्तर दयायला नको का ?

**मा. आयुक्त :**

आमची प्रधान सचिवांनी तुर्त बैठक घेवून सर्व आयुक्तांना सांगितले की, कॅबिनेटचा निर्णय असा आहे. त्या कॅबिनेटच्या निर्णयानंतर. मग सर्व पदाधिकाऱ्यांची,सभापतीसाहेब, पण त्या मिटिंगला गेले असतील. राज्यमंत्र्यांनी एक मिटिंग घेतली. तिथे मा. महापौर, मा. उपमहापौर, विरोधी पक्षनेते, स्थायी समितीचे सभापती, सभागृह नेते. अशा चार-पाच लोकांना सर्व महानगरपालिकेच्या लोकांना बोलवले होते. तिथे माझ्या माहितीनुसार .....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब,कधी बोलवले होते?

**मा. आयुक्त :**

२७ तारखेला बोलवले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही जेव्हा मागच्या मिटिंगमध्ये विचारले होते. तेव्हा तुम्ही स्थायी समितीला कल्पना का दिली नाही ६ तारखेला.

**शरद पाटील :-**

ह्याच्या अगोदर स्थायी समिती किती तारखेला झाली.

**मा. आयुक्त :**

७ तारखेला.

**शरद पाटील :-**

तेंव्हा तुम्ही विचारले होते?

**मा. आयुक्त :**

काय म्हणून विचारले होते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यावर शासनाचे आदेश,मिटिंग वैगेरे काय झाले का?

**मा. आयुक्त :**

मी प्रशासनाला एकच सांगतो. मी कुठे ही शपथ पत्र देईन.सुप्रिम कोर्टापर्यंत सुध्दा देईन.की, मला प्रधान सचिवांनी सांगितले की, १ ऑगस्ट पर्यंत तुम्ही सेसची तयारी ठेवा. त्यामुळे मी तयारी ठेवतो. पण काही लोअर ऑफिसरची अशी धारणा असते की, लेखी नाही तर आम्ही कसे सांगू आणि परत स्टँडींग म्हणणार त्यालाच धरून बसणार तुम्ही १ ऑगस्ट सांगितले आम्हाला माहित नाही. आता तुम्ही १ ऑगस्ट पर्यंत....

**शरद पाटील :-**

साहेब, ह्यांना कोणत्या वेळेला बोलवले होते.

**मा. आयुक्त :-**

म्हणून त्यांनी भितीपोटी सांगितले नसेल अशी माझी धारणा आहे.

**शरद पाटील :-**

आता ह्या अगोदरच्या स्टँडींगमध्ये.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य गारोडीयाजी मी तुम्हाला तेच सांगतो की, आज सुद्धा लेखी आलेले नाही. तथापी २२ तारखेनंतर आपल्याला काही अडचण होउ नये आपल्या महानगरपालिकेचे नुकसान होउ नये आणि शासन ज्यावेळेला लावेल त्यावेळेला सेस लावेल. आपल्याकडे टेंडर कॉल करू देत नाही. मी शासनाला तसे लेखी पत्र दिलेले आहे. की आम्हाला टेंडर कॉल करू द्या. नाहीतर सेसबद्दल मार्गदर्शन करा. शासनाला आपण प्रत्येक गोष्ट हाताने धरून नाही करू शकत. त्यामुळे आपण आपली सोय बघु. ह्या सोयीच्या दृष्टीकोनातून हा ठराव आणलेला आहे. आणि हा मान्य झाला आणि ह्याला परत मा. महासभेने मान्यता दिली. तर आपले नुकसान होणार नाही. १० टक्के वाढीव प्रमाणे पेसे येतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला हा गोषवारा कोणी बनवून दिला. सी.एफ.सी. ला त्यांनी एक आकडा कमी केला. तर फटाफट लोकांनी विड्रॉ करून पैसे घेउन पण गेले. आता तुम्ही मंजुरी किती तारखेची मागविली करण्यास सहमती ठरविलेली आहे दि. २३/०६/२००७ ते ३१/०७/२००८ पर्यंत आहे. तुम्ही वाचा.

**मा. आयुक्त :-**

दि. ३१/०७/२००८ मध्यरात्री पर्यंत.

**मिलन म्हात्रे :-**

७ कशी असेल. साहेब, एक वर्ष झाले. सहमती दर्शविलेली आहे. दि. २३/०६/२००७. मग साहेब एक वर्ष झाले ना.

**मा. आयुक्त :-**

ही टायपिंग मिस्टेक झालेली आहे तर आय ॲग्री.

**मिलन म्हात्रे :-**

टायपिंग मिस्टेक झालेली आहे. तर त्या टायपिंग मिस्टेक खाली विड्रॉ झाली पाहिजे. फटाफट सी.एफ.सी चा पेमेंन्ट

**एस. ए. खान :-**

बघा ना चौकशी करा.

**मिलन म्हात्रे :-**

२ करोड रु.पर्यंत अमाउन्ट झालेले आहेत.

**एस. ए. खान :-**

दोन शुन्य लावल्यामुळे २ करोड रु. अमाउन्ट झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब टायपिंग मिस्टेक आहे.

**मा. आयुक्त :-**

दि.२३/६/२००८ ते ३१/७/२००८ असे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते बरोबर आहे. इथे टायपिंग मिस्टेक आहे. आपण कालावधी वाढवून देतो. आता वर्ष भराचे अमाउन्ट पूढे कमी होईल.

**मा. आयुक्त :-**

दि.२३/६/२००७ ते ३१/७/२००८ आहे. कृपया त्याचा जरा २००८वाचावे. एवढीच माझी विनंती आहे.समोर ३९ दिवस म्हटलेले आहे आणि ३९ दिवसाचा प्रति हप्ता किंवा प्रति दिवस करुन अमाउन्ट ही तेवढीच ९ कोठी रु. येईल. थोडक्यात हा ९ कोठी रु.पूढच्या १ महिन्यात ७ ते ८ दिवसात वसूल करायचे की नाही. हा त्याचा निर्णय आहे. जर ९ कोठी रू. आपला हा ठराव मंजूर करुन वसुल होत असेल तर काय हरकत आहे. अशी माझी समितिला विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुमचा ठराव योग्य आहे. जसे तुम्ही ऑगस्टचे सांगितले ना. साहेब समझा जर १ ऑगस्ट नंतर नाही मिळाले.

**मा. आयुक्त :-**

१ ऑगस्ट पर्यंत नाही मिळाले तर शासन दोन प्रकारे आहे. केले तर १ ऑगस्टला लागू करतील किंवा डायरेक १ एप्रिल २००९ला लागू करतील.तसे जर झाले तर आपण टेंडरचा पर्याय ओपन ठेवू.असे माझे म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही तसे म्हणा.माझी हरकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्या ठरावात म्हटले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही म्हणा ना.माझी एक विनंती आहे की,हा ठराव परत मा.महासभेसमोर मान्यतेसाठी आपणच शिफारस केली तर बरे राहिल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, बरोबर. हा ठराव येथे मंजूर झाल्यानंतर मा.महासभेपूढे शिफारसी साठी घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण तो बेसलेस असणार आहे.

**सुनिता पाटिल :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, ''ड'' वर्ग महानगरपालिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक ती पुर्व तयारी सुरु करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वता ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासून उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही, म्हणून मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. १९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु. ९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु. १,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याअंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरुन दि. ३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना मुदतवाढ देउन कार्यादेश देण्यास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. सदर विषय हा मा. महासभेपुढे अंतिम मंजुरी घेण्यात यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

खास सभा लावून मंजूरी घेता येईल.

**मा. आयुक्त :-**

माझी समितीला विनंती आहे की,१९ तारखेच्या मा.महासभेमध्ये हा विषय घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब,असे येणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब,त्याच्यात सूचना लिहून घ्या.आणि त्या वाचून कायम करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वरती १ कोठी ८४ लाख रू.लिहिलेले आहे.आणि खाली ९ कोठी ८३ लाख रू.लिहिले हे समजत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब,ठरावाचे वाचन करा. रक्कम मोठी आहे. ह्याच्यात त्यांनी सांगितले की, मा. महासभेला रेफर करायचे की नाही. त्याचे काही नाही ते लिहा.

**मा. आयुक्त :-**

आता म्हणजे ७ दिवस.

**मिलन म्हात्रे :-**

मा.आयुक्त साहेब, तुमचे डायरेक्शन काय आहे.ते ठरावात लिहायला लागतील ना.एकतर वाचून कायम करायला लागेल.म्हणजे तो लगेच होईल. ठराव मा. महासभेपुढे मंजूरी करीता लागू करावा.

**मा. आयुक्त :-**

माझी विनंती अशी राहिल की, १९ तारखेच्या मा. महासभेमध्ये हा विषय घेतला तर बरे होईल.

**मिलन म्हात्रे :-**

१९ तारखेच्या मा. महासभेला हास्य होणार.विषय पत्रिकेवर विषयच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पूढच्या मा. महासभेमध्ये विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही एक काम करु शकता की, आयत्या वेळेला जर तुम्हाला काही पत्र आले असतील....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, खास सभा लावा ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही एक काम करा की,त्या ठेकेदाराची तुम्हाला पत्र आले असतील ना.

**मा. आयुक्त :-**

हो.

**मिलन म्हात्रे :-**

मग, तीच पत्र तुम्ही सभागृहापूढे घेवू शकता मा.आयुक्तांच्या आयत्या वेळेत हा प्रश्न येवू शकतो.साहेब,आम्ही असे करतो की, स्थायी समितीचे चार सदस्य,मा.महापौरसाहेबाना पत्र देवून ती सभा एका विषयाकरिता लागू शकते.

**मा. आयुक्त :-**

मला फक्त अशी विनंती करायची आहे की,आपण हा जो बेस घेतलेला आहे.तो मा.महासभेचा ठराव आहे.रेट त्याचेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याच्यात करता येईल. ही सभा संपली ना की, लगेच दुस-या मिटिंगची घोषणा करुन दुसरी सभा सेम डे लावून त्याच्यामध्ये हा विषय पास करु शकता. आम्ही चार लोकांनी नोटिस दिली तर.

**नगरसचिवः-**

किमान ७ दिवस तर लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

७ दिवसाचे आहे तर ७ दिवसात करुन टाका. चालेल. आज तारीख १७ आहे.

**नगरसचिवः-**

पूर्ण ७ दिवसासाठी

**मिलन म्हात्रे :-**

पण त्याच्यातला मधला मार्ग तोच आहे. आमच्या चार लोकांच्या तुम्हाला सहया देतो. आणि मा.महासभा या स्पेशल विषयावर लावायला सांगतो.तोच पर्याय आहे.दुसरा पिरियड काही नाही. किमान पक्ष १९नंतर तुम्हाला एक आठवडयात मा.महासभेची मंजूरी मिळेल तुम्हाला ५० हजाराच्या वरती ती काय वस्तु असेल, जी काय खरेदी विक्री असेल ती महासभेपुढे न्यायला लागते.

**शरद पाटील :-**

पहिले असे केलेले आहे म्हणून आम्ही विचारतो, स्टँडींगने केलेले आहे म्हणून विचारतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता बोलता तुम्ही आदी का बोलला नाही.

**मा. आयुक्त :-**

हे तुमच मोठेपण आहे. स्टँडींगच महासभेत असेच मोठेपण ठेवा.

**शरद पाटील :-**

आता करता येईल ना. सभापती साहेब इथेच करुन घ्या ना, महासभेत कशाला जायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मला सांगा म्हात्रे साहेब मा. महासभा पोष्ट फॅक्टो सॅन्शन करु शकेल, पोष्ट सॅन्शन फॅक्टो सॅन्शन देउ शकेल का पोष्ट फॅक्टो म्हणजे कार्योत्तर मंजूरी देउ शकेल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब विषय पत्रिकेवर विषय नाही.

**मा. आयुक्त :-**

जुलै महिन्यामध्ये जे होईल, त्यावेळी स्थायी समितीमध्ये कार्योत्तरी मंजूरीला विषय ठेवला.....

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ते कशाला करता? एका विषयावर मा.महासभा झालेल्या आहेत.हयाच्याही पेक्षा एकदम साधे विषय तुम्ही एक काम करा की,करोडो रु.चा प्रश्न आहे.आम्ही चार सदस्य सही देउन टाकतो.स्पेशल एक विषयाची मा.महासभा लावून मंजूरी घेउन मोकळे होउन जा. समजा, तुम्हाला जर मध्ये पिरियड मिळाला.साहेब मुदत वाढीमध्ये रक्कम वस्तुची अमाउन्ट टाकली की,ती करोडो रुपये आहे. तुमचा लिमिट क्रॉस होतो असे काय करता.साहेबांना विचारा.

**मा. आयुक्त :-**

ह्या टेक्निकलीटी मध्ये न जाता कोणाचे अधिकार आहे. तर आपण मा. महासभेसमोर जावू ना. मा. महासभेला जायला पाहिजे. मी या मताचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महासभेपुढे कार्योत्तरी मंजूरी पण घ्यायाला जावू या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ही अमाउन्ट येणार आहे. म्हणून काही प्राब्लेम नाही.जाणारी असती तर. तो खर्च आहे ना.ही जमा आहे. म्हणून हे जास्तीचे गांभीर्य नाही. आमचे असे आहे की ठरावात टाकून दया.

**नगरसचिव :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, "ड" वर्ग महानगरपालिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक ती पुर्व तयारी सुरु करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वता ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासून उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही, म्हणून मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. १९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु. ९२ कोटी प्रमाणे प्रति

हफ्ता येणारी रक्कम रु. १,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याअंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरुन दि. ३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना मुदतवाढ देउन कार्यादेश देण्यास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. सदर विषय हा मा. महासभेपुढे अंतिम मंजुरी घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला सांगतो त्या शेवटच्या ठरावात आपण दि. २६/०६ पर्यंतच्या नंतर मंजूरी दिले. स्टॅन्डिंग च्या बजेट मध्ये आणि तुम्ही तो ३५ नंबरचा वाचताय हया ठरावात त्या ठरावाचे पण उल्लेख करा. मार्चच्या बजेट मध्ये जो मंजूर झाला होता. अंतिम ठराव तो नाही. स्टॅन्डिंगला मंजूरी दिली होती. त्यांनी उल्लेख केलेला आहे. मग, अंतिम ठराव तो होतो बजेटच्या संदर्भात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तो जो ठराव आहे ना तो फक्त आपण रेट वाढीचाच ठराव दिलेला आहे. आणि ती जकात दरसुची अजुनपर्यंत पब्लिश केलेली नाही. मग तो रेट इंम्प्लीमेंटेशन होउच शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पण तुम्ही मंजुरी वाचली ना. मुदतवाढीचा टाईम आला ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपणांस नविन टेंडर कॉल काढावा लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

टाईम आला ना तुम्ही त्याला मुदतवाढ देता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण त्याला मुदतवाढ देतो. परंतु, आपण जे रेट वाढवले ना ते नविन वर्षाच्या नविन टेंडरसाठी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ठरावात तारिख काय आहे ती बघा. तारीख आहे म्हणून मी बोलतो.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला सांगतो. दि. २३/०६/२००७ नंतर नविन रेट लागू होतील. कारण आपण हे जे ९२ कोटी रू. काढलेले इस्टीमेट आहे ते नविन रेट सह त्यावर १० टक्के धरून काढलेले आहे. त्यामुळे माझे जे स्टेटमेंट आहे त्याची आपण आणखिन खात्री करू.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून सांगतो की, स्टँडींग चा ठराव बघा म्हणजे त्याचा नंबर टाकायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे काय म्हणणे आहे की, मा. महासभेच्या ठरावात दोन्ही गोष्टी आलेल्या आहेत. ९२ कोटी रू. आलेले आहे आणि दि. २३/०६/०७ नंतर नविन रेट लागू करा. असे ही झालेले आहे. मग तो स्टँडींगच्या ठरावाचा ही उल्लेख केला.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तो ठराव अंतिम आहे. तो व्यवस्थित राहील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अकरा आयटमला जे रेट वाढवलेले आहे. त्याचा उल्लेख इकडे होणार नाही होणार ते तुम्ही द्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

अकरा आयटम वर जे रेट वाढलेले आहे. ते रेट वाढवल्यामुळे आपल्याला ९२ कोटी रू. येणार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ते रेट वाढवता येणार नाही. कारण तुमची ११ आयटमची नोटीफिकेशन गेलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

जो धोरणात्मक निर्णय झाला तो मी फक्त सांगतो. त्यातली जी टेक्नीकलिटी आहे की, नोटीफिकेशन नाही झाले म्हणून त्याला वसुल करता येणार नाही. त्याचे नुकसान होईल. परंतु, ज्या दिवशी पब्लिश होईल. त्या दिवसापासुन त्याला वसुलीचा हक्क राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही उद्या नोटीफिकेशन करा ना. तुम्हाला सगळे अधिकार आहेत. पब्लिक नोटीस खाली लावून टाका आणि गर्व्हमेंटला कळवून टका.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, तुम्ही सुचना घेतली का? साफसफाई लावून मा. महासभेपुढे मंजुरीला घ्यायचे आहे. त्याच्यामध्ये सुचना म्हणून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

कार्योत्तर मंजुरी नाही. त्याला अंतिम मंजुरी घ्या.

**नगरसचिव :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, ''ड'' वर्ग महानगरपालिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक ती पुर्व तयारी सुरु करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वता ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासून उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही, म्हणून मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. १९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु. ९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु. १,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याअंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरुन दि. ३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना मुदतवाढ देउन कार्यादेश देण्यास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. सदर विषय हा मा. महासभेपुढे अंतिम मंजुरी घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. सचिवांनी पुढचा विषय घ्यावा.

**प्रकरण क्र १८ :-**

जकात कर वसूलीचा कालावधी संपल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत.

**ठराव क्र १८ :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, ''ड'' वर्ग महानगरपालिकेचा जकात कर बंद करुन उपकर चालू करण्याचे शासनाने धोरण अवलंबिले आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक ती पुर्व तयारी सुरु करण्यात आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा सन २००७-०८ सालातील जकात वसुलीचा ठेका दि. २२/०६/२००८ रोजी मध्यरात्री संपणार आहे.

प्रकरणात तत्वता ३१ जुलै २००८ मध्यरात्री (१ ऑगस्ट २००८) पासून उपकराची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत महानगरपालिकेने जकात कर वसुली करणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे महानगरपालिकेकडून जकात कर वसुल करुन घेतल्यास अपेक्षित उत्पन्न मिळणार नाही, म्हणून मा. महासभा ठराव क्र. ३४ दि. १९/०३/२००८ च्या अन्वये निश्चित केलेल्या दराने व्यापारी व नागरीकांकडून जकात कर वसुली करण्यास आणि अपेक्षित देकार रक्कम रु. ९२ कोटी प्रमाणे प्रति हफ्ता येणारी रक्कम रु. १,८४,००,०००/- (रु. एक कोटी चौऱ्याअंक्षी लाख मात्र) एवढी महानगरपालिकेस नियमित भरुन दि. ३१/०७/२००८ पर्यंत जकात वसुली ठेकेदार मे. कोणार्क इन्फ्रा. लि. यांना मुदतवाढ देउन कार्यादेश देण्यास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. सदर विषय हा मा. महासभेपुढे अंतिम मंजुरी घेण्यात यावा.

**सुचक :- श्रीम. सुनिता पाटील अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १९, मिरारोड येथील हॉस्पीटल इमारतीस कुंपणभिंत घालणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये मागची जी प्रोसिडींग आहे. प्रोसिडींग मध्ये पान क्र. ५१ त्याच्यामध्ये मिरा रोड हॉस्पीटल करिता कुंपण भिंत बांधणे १७ लाख ४३ हजार रू. आणि आता जी अमाउंट आहे ती १३ लाख २५ हजार रू. मग ४ लाख रू. कसे काय कमी झाले रेट कमी झाला का?

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये कमिशनर साहेबांची अपॉईंटमेंट झाल्यावरती त्यांनी प्रत्यक्ष पुर्ण जागेची पाहणी केली आणि त्यांनी त्याप्रमाणे काही बाबी कट करायला सांगितल्याप्रामाणे ते कट करून नविन एस्टीमेट केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठल्या बाबी कमी करायला सांगितल्या?

**दिपक खांबित :-**

कम्पाउंड वरची लेन्थ म्हणजे आतमध्ये, पाठीमागे प्रत्येकाला पार्टीशन वगैरे केले होते ना. त्या लेन्थ आपण सगळ्या कमी केल्या.

**मा. उपायुक्त :-**

कमी झाले चांगली गोष्ट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण एक्झीक्युटीव इंजिनियर आहात मग आपण अगोदर बघितले नव्हते का?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, कमी झाले म्हणजे पुर्वीचे चुकीचे झाले असे होते का?

**मा. आयुक्त :-**

असा त्याचा अर्थ नाही. आधिचे चुकीचे होते आणि नंतरचे करेक्ट आहे. आता ही बॉटल आहे. बिसलरीच्या ऐवजी दुसरी बॉटली ठेवली तर किंमत वाढेल. बॉटलच्या ह्याच्यावर किंमत असतात. तर आम्ही एक्स च्या ऐवजी वाय ची बॉटल घेतली.

**शरद पाटील :-**

साहेब, आम्ही ज्यावेळेला मागच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये विचारले होते की, ह्याची लांबी रूंदी तुम्ही दिवाराप्रमाणे द्या ना की पुर्वेला एवढी, पश्चिमेला एवढी, दक्षिणेला एवढी, उत्तरेला एवढी लमसम द्यायचे कारण नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पद्धतशिर असते.

**शरद पाटील :-**

कशी पद्धतशिर असते.

**दिपक खांबित :-**

साहेब, पद्धतच तशी असते. एस्टीमेट मंजुर करायचे, एस्टीमेटची पद्धत तशीच आहे.

**शरद पाटील :-**

एस्टीमेटची जरी पद्धत अशी असली ना तरी माहितीसाठी तुमची टीपणी यायला पाहिजे होती ना. कुठची भिंत....

**दिपक खांबित :-**

प्रत्येक फाईल जी असते ती आम्ही फाईल सचिवांच्या ताब्यात बघण्याकरिता दिली असते. जेव्हा स्टँडींग ला विषय देतो ना तेव्हाच आम्ही त्यांना बघण्यासाठी फाईल देतो.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब हे खरे बोलतात की, खोटे बोलतात?

**शरद पाटील :-**

सचिवांना दिले असेल तर सचिवांनी सांगायला पाहिजे का?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे गोषवारे सुद्धा येत नाही. फाईली कुठून येतात आणि तुम्ही जर फाईल चेक करायला लागला तर तुम्हाला सिटी इंजिनियरचे ज्ञान असायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

खांबित साहेब, आम्ही मागच्यावेळी सांगितले होते की, त्याची प्रत्येक भिंतीची लेन्थ द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा ठराव मागच्या वेळेला फेटाळला होता.

**शानू गोहिल :-**

मिरारोड येथे आरक्षण क्रमांक १९२,१९३ या जागेत महानगरपालिकेमार्फत हॉस्पीटल इमारत बांधण्यात आलेली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सदर इमारतीस कुंपणभिंत बांधावयाची असून तसा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेत ठेवला असता मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२००८ ठराव क्र. ३५ अन्वये सदर प्रस्ताव जागेचे मोजमाप दिले नसल्याने व परिपूर्ण नसल्याची कारणे देउन नामंजूर केला. तथापी सदर कुंपणभिंत बांधणे आवश्यक आहे. सदर कुंपणभिंत १८६.०० मीटर लांबीचे बांधावयाचे असून त्याकरीता रू. १३,२५,१००/- एवढा खर्च येणार आहे. सन २००८-०९ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामी तरतूद उपलब्ध असल्याने सदर अंदाजपत्रकीय खर्चास व निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, कुंपण भिंत बांधली, बांधून होईल, हॉस्पीटल रेडी आहे सगळ आहे. हे चालू करायचे आपले धोरण का होत नाही.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

हॉस्पीटल का चालू करत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण १९ तारखेचा जनरल बॉडीचा अजेंडा बघितला असेल तर त्यात आपण आयटम ठेवले आहे आणि त्या दृष्टीनेच ठेवलेला आहे की, आपण लवकरात लवकर सुरू करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आता टेंभा हॉस्पीटलची भिंत बांधताना सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे यांनी सांगितले. तर ती भिंत दगडाची नको आर.सी.सी. ची पाहिजे. ठराव निविदा पास झाला. दगडाच्या भिंतीचा केली आर.सी.सी भिंत नंतर वाढीव, म्हणजे इकडे दगड आणि आर.सी.सी. चा उल्लेख झालेला नाही ही एक गोष्ट दुसरी आम्ही का बोलतो लांबी रूंदी आमच्या गटाची बैठक होते, ह्या भागातले कार्यकर्ते आमच्याकडे येतात त्यांनी सांगितले त्या हॉस्पीटलच्या एका साईडची भिंत त्या सोसायटीने आम्ही बांधलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

ती आपण ह्याच्यात घेतलेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून मागच्या वेळेला फेटाळण्याचे कारण आहे. आजची भिंत ही दगडाची आहे की, आर.सी.सी. ची आहे. हे ह्याच्यात उल्लेख करा.

**मा. आयुक्त :-**

खाली दोन अडीच फुट दगडाची राहिल आणि वरती लोखंडाचे ग्रिल राहतील.

**शरद पाटील :-**

आपण जेव्हा आर.सी.सी करायचे घेतले होते. आपण टेंभा हॉस्पीटलची भिंत ही दगडाची रद्द केली होती. जेव्हा दगडाची बांधायची होती तेव्हा आर.सी.सी बांधावी म्हणून आमचे मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचना केली. त्याच्यामुळे रद्द करून परत वाढीव भिंतीसाठी आले आणि आपण परत आता दगडाची भिंत बांधतो आणि परत त्याच्यासाठी वाढीव होवू नये. म्हणून त्याचा काय तो एकदाच खुलासा करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, लोखंडी ग्रिल वगैरे सोडून द्या ना तिकडे होईल. तेवढे आर.सी.सी. करून घ्या ना. वन टाईम इन्वेस्टमेंट.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये असा उद्देश आहे तुम्ही जर आर.सी.सी. केली किंवा सहा आखुन पुर्ण दगडाची केली. त्याच्यावर लगेच त्याचा आधार घेउन टपऱ्या बसणे. त्याच्यावर अतिक्रमण होणे. त्याच्यावर प्लास्टीक बांधून धंदा सुरू होणे. असले प्रकार होतात. ओव्हल मैदानावर जर आपण जातो तिथे मैदानचे मैदानही दिसते आणि ते ग्रील मोठमोठे असल्यामुळे ते स्वच्छ दिसते तिथे ही भरपूर चांगले पटांगण आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्या खाली जे आहे ना. खाली जे दगडी बांधकाम आहे ना.....

**मा. सभापती :-**

ह्या सर्व चर्चा चाललेल्या आहेत त्या चर्चेचे नोंद करू नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर.सी.सी. बद्दल चर्चा आहे तर नोंद करून घ्यायला लागेल.

**शरद पाटील :-**

हॉस्पीटलच्या भिंतींची चर्चा आहे. ह्याची नोंद घेउ या.

**मा. आयुक्त :-**

जरा चांगले दिसावे म्हणून ते केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दगडाच्या ऐवजी खाली आर.सी.सी. घ्या.

**मा. आयुक्त :-**

तसे करता येईल. पण जे काही दोन अडीच फुट आहे तेवढाच बेस राहिल. वरती मोठ्या सुंदर चांगल्या जाड ग्रिल येतील.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आमच्या गटनेत्याच्या केबिनचे काय झाले? कारण मा. महापौरांनी पत्र दिलेले आहे की, आपल्या स्टँडींगमध्ये मंजुर झालेले आहे. टेंडर निघालेले आहे.

**दिपक खांबित :-**

स्टँडींगमध्ये ५ जुनला पास झालेला आहे. त्यानंतर ६ तारखेला लगेच कामाचे टेंडर बघितले होते. दैनिक लोकसत्तामध्ये बांधकामाचे टेंडर मंजुर झाले होते. दरम्यानच्या काळामध्ये ०७/०६/२००३ मा. महापौरांनी पत्र देउन या गटनेत्याच्या केबिनबाबत टाउन प्लानिंगची परवानगी घेण्यास सांगितली होती. की, जे काही नकाशे आहेत ते टाउन प्लानिंगच्या नियमाप्रमाणे मंजुरी घ्या असे एक पत्र दिले होते. त्याप्रमाणे आम्ही टाउन प्लानिंग कडे मंजुरी करिता दिलेले आहे. अभिप्रायाकरिता....

**एस. ए. खान :-**

पत्र वाचा.

**मा. सभापती :-**

तुम्ही इतके सर्व केबिन बनवता, ॲन्टीचेंबर बनवता सर्व बनवता. त्यावर परवानगी घेतलेली आहे का? घेतली असेल तर दाखवा. एवढे फेरबदल झाले. त्याची परवानगी दाखवा. माझ्या केबिनची सभागृह नेते यांच्या केबिनची मला परवानगी दाखवा. या महापालिकेमध्ये जेवढ्या केबिन झाल्या त्याची मला परवानगी दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

२००३ ला तुमचा सी.आर.झेड. चा प्लॅन लागला.

**एस. ए. खान :-**

पत्र काय दिलेले आहे ते वाचून दाखवा.

**नगरसचिव :-**

श्री. नरेंद्र मेहता, मा. महापौर साहेबांचे पत्र आहे. मा. आयुक्त साहेबांना हे पत्र दिलेले आहे. विषय :- विकास नियंत्रण नियमावलीमध्ये उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत.

महोदय,

वरील विषयानुसार कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गटनेत्यांना केबिन मुख्यालय तळ मजल्यावर केबिन उपलब्ध करुन देण्योकरीता कामाची निविदा दि. ०६/०६/२००८ रोजी दै. लोकसत्ता या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. महानगरपालिका मुख्यालय ही इमारत सी.आर.झेड. ने बाधीत आहे. तसेच अशाप्रकारे केबिन तयार करण्यासाठी नगररचना विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु, संबंधित विभागाकडून कोणतीही परवानगी घेतलेली नाही. यामुळे विकास नियमावलीचे उल्लंघन होत आहे. हा एक अजामिन पात्र गुन्हा आहे. विकास नियमावलीचे उल्लंघन करुन आवश्यक त्या परवानग्या न घेता मुख्यालय इमारतीमध्ये फेर रचन करण्याचे काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. महानगरपालिकेचे अधिकारी ज्याप्रमाणे मिरारोड येथील साईबाबा नगर उद्यानातील बांधकाम कारणाऱ्या सोसायटीच्या पदाधिकारी विना विलंबन एम.आर.टी.पी. अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्याचप्रमाणे महानगरपालिका नियमाचे व विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यावर त्वरीत एम.आर.टी.पी. अंतर्गत गुन्हा दाखल करुन सदर निविदा प्रक्रियेस स्थगीती देण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

हे पत्र देणाऱ्या मा. महापौरांना या बाधीत होणाऱ्या इमारतीत बसण्याचा नैतिक अधिकार नाही. ती खुर्ची त्यांनी का ठेवावी. पहिले त्यांनी फुटपाथवर बसावे. वरील बिल्डींग सी.आर.झेड. ने बाधीत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जेव्हा मा. महापौर बसले तेव्हा त्यांनी सुध्दा फेरबदल केला तेव्हा सी.आर.झेड. बाधीत नव्हते का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्यांनी आयुक्तांना पत्र दिलेले आहे. तर मा. आयुक्त साहेबांनी पहिले अधिकाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करावी. तुम्ही पहिला मा. महापौरांवर केस दाखल करा ना. या बाधीत झालेल्या इमारतीवर खुर्ची टाकून का बसता?

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही पहिला त्यांच्यावर गुन्हा दाखल करा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही पहिला मा. महापौरांवर गुन्हा दाखल करावा त्यानंतर तुमचे अधिकारी येतिल. त्यानंतर एवढे फेरबदल करून सभागृह नेता जेवढे बसतात, उपमहापौर आहेत ह्यांच्यावर पण कारवाई करावी.

**मा. सभापती :-**

१९ तारखेला मा. महासभा लागलेली आहे. आणि मी आज खांबितला आजच्या आज ऑर्डर देतो. काम चालू झाले पाहिजे. जर १९ तारखेपर्यंत काम चालू नाही झाले तर मी त्याला दाखवतो. जेवढे नगरसेवक असतील त्याची पहिली खुर्ची खाली करायला लावू. आज पासुन काम सुरू झाले पाहिजे. ही मी ऑर्डर देतो. आणि उद्या पासुन अख्खी महानगरपालिका तोडण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तसे नाही. त्यांना मा. आयुक्त साहेबांना पत्र मार्क केलेले आहे. आपल्या निर्णयानुसार मा. आयुक्त साहेबांनी काय करावे हे तुम्ही आदेश द्या ना.

**मा. आयुक्त :-**

मा. आयुक्त साहेबांना तसे आदेश देता येत नाही.

**नयना म्हात्रे :-**

या विषयावर मा. आयुक्तांचे काय म्हणणे आहे ते मांडावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या सभागृहाने निर्णय घेतला. तुम्ही सभापती म्हणून ठराव पास केला. त्याला काहीतरी कायदेशीर बाब आहे की नाही आधार आहे की नाही. विभागातर्फे तुम्ही आमच्याकडे गोषवारे आणले आता कशाला ऑक्ट्रायचा आणला. तुम्हांला कुठे कुठे कारवाई करायची आहे म्हणून आणला. आम्ही तो ठराव पास करुन दिला. त्याला विधिवत कायदेशीर एक घटनात्मक आधार मिळाला. आम्ही ठराव पास करुन दिलेले आहे. उद्या कोणी नगरसेवक येईल. पत्र टाकेल आणि तुम्हांला स्थगिती मागेल.

**एस. ए. खान :-**

त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचा ठराव करुन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे काय चालले आहे हे बरोबर नाही आणि तुम्ही आयुक्त साहेबांना मार्गदर्शन करा. तुमच्या सचिवांनी विषय पत्रिकेवर विषय आणला पाहिजे होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

विषय पत्रिकेवर विषय नाही म्हणून आपण ह्या विषयावर ठराव करु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आणि तुम्ही जी चर्चा थांबवली ना. ती चर्चा सुद्धा प्रोसिडींगला नोंद झाली पाहिजे कारण मा. आयुक्त साहेबांना आलेली पत्र आणि सचिवांना आलेली पत्र हे स्थायीमध्ये आली पाहिजे. ते पत्र रेकॉर्डवर आले पाहिजे आणि जे पत्र आले त्याच्यावर चर्चा होवू शकते. प्रोसिडींग होवू शकते.

**मा. सभापती :-**

मला हे परवा माहित पडले. अजेंडा निघाल्यानंतर कळाले की असे असे काम बंद पडले तर काम का बंद पडले हे मला बोलले नाही.

**एस. ए. खान :-**

काम चालू करायला सांगा. जे काही होईल आम्ही बघून घेवू.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्यांनी तुम्हांला लेखी पत्र दिले ना. तुम्ही आमच्या स्थायी समितीच्या सभापतींना लेखी उत्तर द्या की आमचा ठराव तुमच्याकडे गेला आणि जे शहर अभियंता आहे त्यांनी काय करावे ह्याच्यावर लेखी उत्तर द्या. ही दुसरी वेळ झाली. लक्ष्मी कारचे पाण्याचे कनेक्शन कापा. शहरामध्ये पाण्याचा फार तुटवडा आहे. आम्ही ठराव केला. तीन महिने झाले. तिसऱ्या महिन्यातला ठराव आहे. आणि आज आठवा महिना आहे. त्याच्यावर अजून कारवाई नाही. तोडायला गेले.....

**मा. सभापती :-**

नगररचना वाले जर खेळ खेळत असतील ना तर आम्ही या मा. महासभेत बसू देणार नाही त्यांना ह्या पदावरुन शासनाकडून इथनं हकल पट्टी करायला मागणी करु.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यात नगररचनेचा काही सबंध येत नाही.

**मा. सभापती :-**

प्लॉन पास नाही. मग कसे मंजूर केलेले आहे. सी.आर.झेड मध्ये असताना कशी बिल्डिंग बांधलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांना ह्याच्यामध्ये प्रत्येकाला पत्र देण्याचा आणि आक्षेप घेण्याचा अधिकार आहे त्या अनुषंगाने त्यांनी घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब महापौर म्हणजे या शहराची मोठी प्रतिष्ठीत व्यक्ती आहे.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब तक्रारीला बेस पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ऑलरेडी आपल्या सन्मा. समितीची मान्यता आहे. आपण त्या दृष्टीने पुढे गेलेला आहोत. टेंडर कॉल केलेले आहे. एखाद्या सन्मा. सदस्यांनी जर एखादा मुद्दा उपस्थित केला असेल. तर प्रशासनाला...

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी पहिला आकस कुठला घेतला. हे गट जे आहे ते अधिकृत नाही हा पहिला आकस आहे. ह्याच्यात प्रोसिडींग होती. ह्याच्यात सगळी चर्चा होती. मा. कोकण आयुक्त तुमच्या बेलापूरला बसतात. त्यांनी

गटाला मान्यता दिले अधिकृत कंम्प्यूटर ऑथोरिटी आहे. त्यांचे तुम्ही तीन तेरा वाजवत असाल तर हे कारण नको, आम्ही पत्र शो केले. आता काल माझी सभागृह नेतेची केस होती. आम्ही हायकोर्टात पण ते लावलेले आहे. साहेब आम्हांला मान्यता दिलेली आहे. आज गटनेता म्हणून त्यांनी असे ही केले की ,खाली लिहायचे नाही. पत्र लिहा मिलन म्हात्रे गटनेता नाही लिहायचे. तुम्ही कोण ठरवणार? तुमची गट तिकडे स्थापन झाले. तुमचे गट स्थापन झाल्यानंतर आतापर्यंतची मतदान झाली सगळं काय आहे. ग्रुप रजिस्टर झाले. त्याच्यावर तुमच्या ग्रुपला पण मान्यता दिली. हे दोन प्रकार आहेत. एका पक्षाच्या माणसाने गटनेता कोण ते पहिले तिकडे जाउन द्यायचे ते मी दिले असते. बाकीच्यांनी पण दिले त्यानंतर ग्रुप आमचे जे पक्ष आहे त्याचे अलग अलग ग्रुप आहे. त्यांनी एका गटाला मान्यता न देता दोन गट. एक सत्ताधारी आणि एक विरोधक असे दोन वेळा आमची रजिस्ट्रेशन झाली आणि मग मा. महापौर साहेब म्हणतील हे चुकीचे आणि हे बरोबर. हे गटच अस्तित्वात नाही हे गटच  बेकायदेशीर आहे. हे तुम्ही ठरवणारे कोण? त्या पहिल्या वेळैला २८. तारखेला मा. महापौर बसले २९ ला कोकण आयुक्तांचे पत्र आले की ह्या महापालिकेतला गटनेता कोण? त्याच्यावर तुम्हांला ॲक्ट करायचा होता. मी त्याच्यानंतर पत्र व्यवहार केला. तिकडे आम्हांला मंजूरी नाकारताना. काय सांगितले की त्या कमिशनर साहेबांची परमिशन कमिशनर साहेबांना आम्ही जावून भेटलो.तर ते म्हणतात की आमचे काम घेणे देणे आहे. आम्ही तुमचे गटनेते कोण येथे एकदा डिक्लेअर केला विषय संपला पाच वर्षे तुम्ही राहिले नंतर हे दोन गट बनले ते शेवटचे लास्ट बनले. म्हणजे नविन कायद्यानुसार त्याच्यात तरतुद इलेक्शन नंतर फॉर्म १, शेड्यूल १ म्हणून त्याचे असे आहे. इंग्लिश मध्ये फॉर्म भरून द्यायचे ते आम्ही भरुन दिलेले आहे. आमच्याकडे फाईल आहे. ॲक्नॉलेजमेंट कॉपी आहे. साहेब कसे आहे की आज आम्हांला दिड वर्ष वंचित रहायला लागले ना. मा. महापौरांना या सी.आर.झेडमध्ये बाधित झालेल्या इमारतीत बसायला खुर्ची मिळाली आणि आम्ही बाहेर बसतो. मा. उपमहापौरांना बाधीत झालेल्या इमारतीत अँन्टीबरोबर मिळाले खुर्च्या मिळाले सगळे मिळाले.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौरांनी सी.आर.झेड मध्ये भरणी केली. तर त्यांच्यावर आधी केस करा ना. मी उद्या नगररचनामध्ये पत्र देतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेबांनी ह्याच्यामध्ये जो आक्षेप घेतलेला आहे. त्याबद्दल मी समितीला एवढेच सांगेल. त्याची आजच्या आज शहानिशा करुन पुढील कार्यवाही केली जाईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आजच्या स्थायी समितीमध्ये जे विषय आलेले आहेत त्याला माझ्या कुठल्याही विषयाला विरोध नाही पण माझ्या ऑफीसचे काम कधी चालू करता ते सांगा. विषय कधी घेता?

**मा. आयुक्त :-**

मॅडम, ह्याच्यामध्ये सुभाषचंद्र बोस मैदानापासून उत्तनपर्यंत जो मोठा रोड आहे. तो एम.एम.आर.डी.ए. करिता स्वतः करित आहे. आम्ही खांबित साहेबांना उद्या किंवा परवा एम.एम.आर.डी.ए. कडे पाठवतो. आपण खात्री करु. जर एम.एम.आर.डीए.ऑलरेडी रस्ता करत असेल आणि त्यात जर पूल होणार असेल तर आपले ४०-४५ लाख रु. कशाला घालायचे? एवढाच फक्त प्रश्न आहे समजा जर त्यांनी रस्ता नाहीच केला तर आपण लगेच करायला सुरुवात करु.

**नयना म्हात्रे :-**

त्यांनी जर सांगितले की आम्ही दोन वर्षाने करु. आमचे दोन वर्ष रस्त्याचे काम चालू आहे तोपर्यंत तुम्ही ब्रिजचे काम करणार नाही का?

**मा. आयुक्त :-**

मॅडम, ह्याच्यात दोन मुद्दे आहे. एम.एम.आर.डी.ए. घेणार आहे की नाही? आणि किती दिवसात घेणार? दुसरा ही मुद्दा आपण तपासू.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब मी ऐकून ऐकून पाच वर्षे निघून गेली. मी तर एम.एम.आर.डी.ए. चे नाव ऐकून पाच वर्षे निघून गेली.

**मा. आयुक्त :-**

मॅडम तुम्ही चार दिवस थांबा. मी स्वतः खात्री करुन घेतो मग आपण पुढे जावू.

**नयना म्हात्रे :-**

त्यांनी तुम्हांला सांगितले होते की आम्ही देवू. मग कधी देतील? काय करतील?

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हांला दोन मुद्दे सांगितले घेणार का? आणि किती दिवसात घेणार? मी तुम्हांला एक उदा सांगतो आपण ईस्ट चे आणि वेस्टचे ब्रिज जो आहे आणि आपला आणखीन कुठला एक प्रस्ताव जे.एन.एन. यू.आर.एम. मध्ये होता त्याला भरपूर वेळ लागतील म्हणून आपण तो विड्रॉ केला. एम.एम.आर.डी.ए. करणार

म्हणजे कायमस्वरुपी एम.एम.आर.डी.ए. कडे डोळे झाकून रहावे असे नाही. वेळ लागत असेल तर आपणही करु.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मागच्या स्थायी समितीमध्ये ठराव झाला होता की फाटका वरचे टेम्पो हटवायचे. परवा मी पानपट्टे साहेबांना फोन केला की.....

**शरद पाटील :-**

साहेब टोईंगचे काय झाले?

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण त्यांचा ठेका घेतलेला आहे का की महानगरपालिकेने जागा द्यायला पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब नो पार्कींग चा बोर्ड लावायचा. हा विषय किती महत्वाचा आहे आज आमच्याकडे रस्त्यावर गाड्या लागतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

माझे म्हणणे एवढे की अद्यापपर्यंत त्या ठरावाचा अंमल बजावणी झाली नाही का झाली नाही हा प्रश्न तुम्ही प्रशासनाला विचारा?

**मा. आयुक्त :-**

पानपट्टे साहेब तुम्हीच नोंद घ्या. तुम्ही दिवटे साहेबांना सांगा. तुम्ही मागचा ठराव काढून मला दाखवा. तेवढे आपण पार्शली लगेच इम्प्लीमेंटेशन करु. हॉकर, बेकर होत राहिल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब दोन ट्रक बिघडलेले आहे ते ७-८ महिन्यापासून एकाच जागेवर उभे आहेत. मिलन पॅलेस हॉलसमोर ते सुद्धा काल साहेबांना सांगितले होते ते हलवले नाही.

**मा. आयुक्त :-**

मी सभागृहाला फक्त एवढे सांगेल की, दहिसर चेकनाका ते घोडबंदरचा चढ हा नॅशनल हायवे जो आहे तो एन.एच.आय. लोकांच्या मदतीने मोकळा केला मग मला माझा एरिया मोकळा करायला अवघड आहे का? मी दुसऱ्याला काम करायला लावले? तर मी स्वतः काम करणार आहे फक्त हॉकर्स काय आहे? पार्कींग काय आहे? कुठे जागा आहे का? पोल आहे कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण न होता शांततेने करावे मी ह्या मताचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आम्ही ह्याच्यामध्ये एक सुचना देतो. ठाकरे म्हणून एक रोड आहे. त्या रोडवर पार्कींग हलवली तर मेन रोड मोकळा होईल ना. साहेब जागा नक्की केले.

**दिपक खांबित :-**

आपण एकदा हलवले सुद्धा होते तर तिथे बाजार भरतो सोसायटीच्या गाड्यांना जायला त्रास होतो म्हणून आपण ठरवले की जे ट्रक टर्मिनल जाईल. तिथे भरपूर जागा आपल्या ताब्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठले ट्रक टर्मिनल त्यांची साईड सांगा?

**तुळशीदास म्हात्रे :-**

घोडबंदरला

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण ठाकरे रोड जो दिलेला आहे. त्या धर्मकाट्याच्या नंतर तो इंडस्ट्रीमध्ये पाहिजे. तिकडे लोकेशन चांगले आहे. आपण तिकडे जावून बघा. आणि तिकडे त्याला रितसर नोटीस द्या आणि नसेल तर टोईंग करुन गाड्या इकडे जमा करुन टाका. दोन दिवस गाड्या ठेवल्या की आपोआप तिकडे गाडी लागेल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त साहेब आपण म्हणालात दहिसर पासून घोडबंदर पर्यंत रस्त्याचे टोईंग केले आणि रस्त्याचे सगळं हटवल पण त्याचा काहीही परिणाम झालेला नाही. तिथे आहे तीच परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम, येण्याचा जो रस्ता आहे. नॅशनल ऑथोरिटी ऑफ इंडिया चा रस्ता आहे. ती गर्व्हमेंट ची एजन्सी आहे. त्यांना आपण मदत केलेली आहे आता त्यांनी हद्दी कायम करुन घेतलेल्या आहेत तुम्ही आता जी परिस्थिती म्हणता त्या गाड्या पार्किंगमध्ये आहे. त्या ट्रक इललिगली पार्क होतात आपण डिवाईस पार्कला पत्र देत आहोत आणि एन.एच.आय. वाल्यांना सांगतो ते ही पाठपुरावा करतील.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

दुसरा विषय असा की माझ्या प्रभागामध्ये ना फेरिवाला क्षेत्र आहे. पण तरीसुद्धा फेरिवाले हे त्याठिकाणी ठाम अडून बसले. रस्ता रुंदीकरण करताना साहेब आपण लोकांची घर तोडली. डी.पी. रस्ता केला आणि त्या डि.पी. रस्त्यावर आज एवढ्या टपऱ्या लागल्या, मटणाच्या दुकाने लागले भाजीवाले फळवाले

असे खूप बसलेले आहेत आणि त्याच्यामध्ये प्लॉस्टीकचे रोड एवढे मोठेमोठे की नागरिकांना रस्त्यावर जायला यायला एवढा त्रास होतो. गाड्यांना यायला जायला त्रास होतो. माझे किती पत्र व्यवहार पालिकेमध्ये झाले आजही कारवाई केली नाही. तर कारवाई का होत नाही? ह्यांचे जरा उत्तर मिळेल का?

**मा. आयुक्त :-**

हे फक्त तुमच्या एरियासाठी नाही. ह्या शहरासाठी आपल्या सगळ्यांना एकत्रिक कार्यक्रम घ्यायचा आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब अतिशय गंभीर विषय आहे.

**शरद पाटील :-**

खरच हा कार्यक्रम घ्या. कारण आमची प्रत्येक वेळेला सगळ्या सदस्यांची पत्रे आहेत. इथे ठराव झालेले आहेत. तरीसुद्धा त्याच्यावर कुठचीही कारवाई होत नाही. त्याची अंमलबजावणी होत नाही. तिथे परत आता शाळा चालू झाले आणि शाळेची पोरं जाताना एवढी गर्दी होते आणि दोन्ही साईडला फेरिवाले बसलेले असतात. आणि केबिनरोडवर बायपास रस्ता आहे. तिकडचे फेरिवाले उचला म्हणून सांगतो ते पण उचलता येत नाही. तिथे दहा बार फेरिवाले आहेत. जास्त फेरिवाले नाहीत. तरीसुद्धा उचलत नाही आणि शाळेत पारं तिथे केबिन क्रॉस रोडवरून जातात. तिकडच्या फेरिवाल्यांना उचलायला सांगितले तर तिकडचे उचलत नाही का तर तिथे पोलिस प्रोटेक्शन मिळत नाही.

**मा. आयुक्त :-**

तिथे पोलिस प्रोटेक्शनची गरज नाही आपण काढू.

**शरद पाटील :-**

साहेब टोईंग ही आपली स्वतःच्या महापालिकेची आहे का? मी गेल्यावेळेला सुद्धा प्रश्न विचारला होता तेव्हा खतगांवकर साहेबांनी सांगितले की पुढच्या वेळेला सांगतो मग ती टोईंग आहे कोणाची? टोईंग ही भाड्याने आहे ना. आपल्याकडे आहे ना

**शरद पाटील :-**

त्याची मुदत संपलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण त्याला मुदत वाढ देवू.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त साहेब या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम किती झालेले आहेत. आता सध्या जी अनधिकृत बांधकामे चालू आहे ती पण थांबवू शकत नाही तोडू शकत नाही का? जी झाली ती बांधकामे झाले पण आता सध्या जी अनधिकृत बांधकाम चालू आहेत. मी गणेश पाटील साहेबांना दाखवली. प्रभाग अधिकारी तर कोण येत नाही? आणि तो निशांत जाधव कोण आहे? त्यांना पण उलट उत्तर देतो आणि काही कारवाई करत नाही. त्याला पालिकेमध्ये कशाला ठेवले? नुसते पोसायला ठेवले का?

**गणेश पाटील :-**

मी त्याला काल फोन केला. काल पंचनामा करुन एम.आर.टी.पी. कडे कालच संध्याकाळी गेलो होतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

